वसा सक्षम मातृत्वाचा
MOM-able
फर्टिलिटी अँड टेस्ट ट्यूब बेबी सेंटर
सोमवार ते शनिवार सकाळी १० ते ४
आता मुंबई, पुणे, नाशिक या शहरात जाण्याची गरज नाही
IVF
ट्रिटमेंटने घ्या मातृत्वाचा आनंद आपल्या संगमनेरमध्ये
आजच आपली अपॉईंटमेंट बुक करा
8080 215 215
9699 327 301
दुसरा मजला, संजीवन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर नाशिक-पुणे रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 46, 000/-
20 कॅरेट मणी = 1, 32, 730/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 19, 450/-
16 कॅरेट मुरणी = 1, 06, 180/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ६३ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । १३/०३/२०२६ । पाने - ८

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## गॅस मिळविण्यासाठी पहाटेपासून रांगा

### मालदाड रोडवर गोंधळ आणि वाहतूक ठप्प


छाया- संदिप शेळके, अगस्ती फोटो, संगमनेर


युवावार्ता (प्रतिनिधी)

शहरातील मालदाडरोड या ठिकाणी कुठलाही अनुचित प्रकार घडलेला नाही, परंतु तरीही संपूर्ण रस्ता बंद झाला असून रस्त्यावर नागरिक आणि वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या आहेत. ही तुफान गर्दी केवळ एक गॅस टाकी मिळावी म्हणून झालेली आहे. साडेनऊ वाजता उघडणाऱ्या या गॅस एजन्सी दुकानासमोर पहाटे पासून नागरिक टाक्या घेऊन रस्त्यावर उभे आहेत. त्यामुळे या परिसरातील इतर दुकाने उघडण्याची देखील सोय राहिली नाही. पोलीसांची मदत घेतली जात असली तरी गर्दी नियंत्रणात येण्याचे नाव घेत नाही. परदेशात भडकलेल्या युद्धाची झळ आणि अफवेच पीक जोमात असल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकारकडून देखील फारशी खबरदारी घेतली जात नसल्याने व नागरिकांना विश्वासात घेतले जात नसल्याने देखील यात भर पडत आहे.

राज्यभरात गॅसच्या संभाव्य तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर गॅस एजन्सीच्या बाहेर प्रचंड गर्दी पाहायला मिळत आहे, त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये यासाठी शासनाने उपाययोजना करावी ही विनंती. दरम्यान मी आज अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. राधाकृष्ण विखे पा. यांच्याशी चर्चा केली. त्यांनी तातडीने अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांना सूचना दिल्या असल्याचे आ. आ. सत्यजित तांबे यांनी सांगितले.

## मुंबई विधानभवन बॉम्बने उडविण्याची धमकी

### खोटा मेल असल्याचे स्पष्ट - गृहराज्यमंत्री



मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबईतील विधानभवन बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे मिळाली असल्याची माहिती मिळत आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच अशा प्रकारची धमकी प्राप्त झाल्यामुळे एकच खळबळ उडाली. यानंतर पोलिसांनी तात्काळ विधानभवनाच्या इमारतीचा ताबा घेत तपासणी केली. बॉम्ब शोधक आणि श्वान पथकाद्वारे इमारतीची पाहणी केली. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. तसेच विधानभवनासह आणखी चार महत्त्वाच्या ठिकाणांसाठीही धमकी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

सुरक्षा दल पाहणी करत असताना इमारतीमधील सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांना बाहेर काढण्यात आले होते, अशी माहिती मिळत आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सकाळी माध्यमांशी संवाद साधत असताना त्यांना याबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर त्यांनी सदर धमकी खोटी असल्याची माहिती दिली गेल्याचे सांगितले.

विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी याबद्दल माध्यमांशी संवाद साधत संपूर्ण माहिती दिली. आज सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी मुंबई आयुक्तांच्या ईमेलवर धमकी प्राप्त झाली होती. विधानभवन बॉम्ब किंवा क्षेपणास्त्राने उडवून देण्याचा त्यात उल्लेख होता. धमकी मिळाल्यानंतर बॉम्ब शोधक पथकाकडून विधानभवन इमारतीची सखोल तपासणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणेने आवश्यक ती दखल घेतली आहे, अशी माहिती रादरम्यान ही धमकी कुणी दिली, याची माहिती अद्याप उघड करण्यात आलेली नाही, असेही राम शिंदे म्हणाले. संवेदनशील ठिकाणांबाबत सदर धमकी मिळाली असल्यामुळे पूर्ण तपासानंतरच त्याची माहिती देऊ, असे त्यांनी सांगितले.

अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्यामुळे आज सकाळपासूनच दोन्ही सभागृहाचे कामकाज सुरू होणार होते. त्याची तयारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी केली आहे. बॉम्ब शोधक पथकाने तपासणी केल्यानंतर आम्ही विधानभवनात प्रवेश केला असून लवकरच कामकाज सुरू करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

आज सकाळी मुंबईत एका निनावी ई-मेलमुळे मोठी खळबळ उडाली. विधानभवनासह मुंबईतील चार महत्त्वाच्या ठिकाणांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी हा मेल प्राप्त झाला, ज्यामध्ये स्फोट घडवून आणण्याची वेळही नमूद करण्यात आली होती. या घटनेनंतर राज्यमंत्री योगेश कदम आणि गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत परिस्थिती स्पष्ट केली आणि जनतेला घाबरून न जाण्याचे आवाहन केले.

राज्यमंत्री योगेश कदम यांनी या घटनेची पुष्टी करताना सांगितले की, विधीमंडळ बॉम्बने उडवून देऊ असा ई-मेल आला होता, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, प्राथमिक तपासात हा एक 'हॉक्स' (खोटी धमकी) ई-मेल असल्याचे दिसून येत आहे. अनेकदा अशा प्रकारे ई-मेल पाठवून प्रशासनाचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केला जातो. राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सुरक्षा यंत्रणांच्या तत्परतेचे कौतुक केले. ते म्हणाले, देशात आणि राज्यात शांतता असताना काही विकृत व्यक्ती वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, गृहविभागाने तत्काळ पावले उचलली असून ही धमकी खोटी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

## नगरसेवकांचा मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या

### नागरी प्रश्नांवर प्रशासनाला सवाल



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील वाढत्या नागरी समस्यांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत संतप्त सत्ताधारी व अपक्ष नगरसेवकांनी बुधवारी थेट मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले. संगमनेर सेवा समितीचे सत्ताधारी नगरसेवक शैलेश कलंत्री आणि अपक्ष नगरसेवक योगेश जाजू यांनी नगर परिषदेत मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या दालनात बसून प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली. नागरी प्रश्नांकडे वारंवार पाठपुरावा करूनही कार्यवाही होत नसल्याने हा पवित्रा घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याबाबत माहिती देताना नगरसेवक योगेश जाजू म्हणाले की, म्हाळुंगी नदीच्या पुलाखाली मोठ्या प्रमाणात गटारीचे पाणी साचत असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. यासंदर्भात नगर परिषद प्रशासनाला तोंडी तसेच लेखी निवेदन देण्यात आले असून परिसरातील नागरिकांनीही तक्रारी केल्या आहेत. हा प्रश्न आरोग्याच्या दृष्टीने गंभीर असताना प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

म्हाळुंगी नदीवर श्री स्वामी समर्थ मंदिर ते श्री संतोषी माता मंदिर दरम्यान उभारण्यात आलेल्या पुलाच्या कामाबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. पुलाचे काम अपूर्ण राहिल्याने नदीपात्रात मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून त्यात गटारीचे पाणी साचत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

जाजू यांनी पुढे सांगितले की, शहरातील स्वच्छता, पथदिवे, गटारी, रिकाम्या प्लॉटमुळे निर्माण होणाऱ्या समस्या यांसारख्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक प्रशासनाच्या काळात प्रभावीपणे होताना दिसत नाही. अनेक कामांसाठी वारंवार पाठपुरावा करावा लागत असून प्रशासनाकडून सहकार्य मिळत नाही. त्यामुळे दर आठवड्याला ठरावीक दिवशी नगरसेवकांच्या उपस्थितीत कामांचा आढावा घेण्याची सक्ती केली पाहिजे, जेणेकरून प्रशासनाला कामात टाळाटाळ करता येणार नाही.

दरम्यान, यापूर्वीही नागरी समस्यांबाबत अनेकदा आवाज उठवूनही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने संताप व्यक्त करण्यात आला. योग्य तो निर्णय न घेतल्यास प्रभागातील नागरिकांसह गटारीच्या पाण्यात बसून आंदोलन करू, तसेच प्रशासनाला जाग आणण्यासाठी अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही नगरसेवक शैलेश कलंत्री यांनी दिला.

## संगमनेरमध्ये शेअर मार्केट गुंतवणुकीच्या नावाखाली साडेसहा कोटींची फसवणूक

### दरमहा १० टक्के परताव्याचे आमिष ६२ गुंतवणूकदारांची लूट – चौघांवर गुन्हा

**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**संगमनेर** - शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून दरमहा १० टक्क्यांपेक्षा जास्त परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत संगमनेर शहरातील तब्बल ६२ गुंतवणूकदारांची ६ कोटी ६५ लाख ३९ हजार ८३७ रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार असल्याची माहिती मिळाली आहे.

संगमनेर शहरात 'अदमास डेप्ट कन्सल्टन्सी प्रा. लि.' व 'प्रथमेश वेल्थ मॅनेजमेंट' या नावाने कंपनी स्थापन करून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. या कंपनीत गुंतवणूक केल्यास दर महिन्याला १० टक्केहून अधिक परतावा मिळेल, असे सांगून अनेकांना आकर्षित करण्यात आले. या आमिषाला भुलून सुमारे ६२ जणांनी मोठ्या प्रमाणात रक्कम गुंतवली. मात्र काही महिन्यांनंतर कंपनीचे कार्यालय अचानक बंद करण्यात आले आणि संबंधितांनी पळ काढल्याने गुंतवणूकदारांमध्ये खळबळ उडाली.

या प्रकरणी महेश विश्वास मोरे (रा. माळेगाव पठार), वैभव विठ्ठल काकड (रा. डोळासने), राहुल शिंदे (रा. आश्वि) आणि विजय तबाजी काळे (रा. मालदाड रोड, संगमनेर) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात योगेश जऱ्हाड यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, डिसेंबर २०२४ मध्ये आश्वि येथील मित्र राहुल शिंदे व विजय काळे यांनी शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवण्याचा सल्ला दिला. त्यानंतर त्यांना संगमनेर येथील कंपनीच्या कार्यालयात बोलावण्यात आले. तेथे महेश मोरे व वैभव काकड यांनी शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा १० टक्क्यांपेक्षा जास्त परतावा मिळेल, असे सांगून गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले.

फिर्यादीकडे मोठी रक्कम नसतानाही आरोपी राहुल शिंदे यांनी वारंवार फोन करून गुंतवणूक करण्याचा आग्रह धरला. त्यानुसार १६ डिसेंबर २०२४ रोजी आरटीजीएसद्वारे महेश मोरे (पान ७)

### ऑफिसला टाळे; फसवणूक उघड

**गुंतवणूकदारांनी कार्यालयात जाऊन विचारणा केली असता ऑफिसला टाळे लावलेले आढळले. त्यानंतर आरोपींशी संपर्क साधला असता उडवाउडवीची उत्तरे मिळू लागली. दरम्यान इतर गुंतवणूकदारांशी संपर्क साधल्यानंतर सुमारे ६० ते ६२ जणांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणात आणखी कोणाची फसवणूक झाली आहे का याचा तपास पोलीस करत असून अशा प्रकारे फसवणूक झाली असल्यास पुढे येऊन तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.**

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त !
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
बस्ता बांधायला यायचं हं!
FOLLOW US
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
गुढीपाडवा विशेष ऑफर!
दागिन्यांच्या मजुरीवर 10 ते 40 — पर्यंत भरघोस सूट!
ऑफर कालावधी: ६ ते २२ मार्च २०२६
आजच शोरूमला भेट द्या आणि नव्या वर्षाची सोनेरी सुरुवात करा!
सोने । चांदी । हिरे | अशोक चौक, संगमनेर. मो : ९३७२०१ २०४४

* स्वर्गवास *
दिनांक. ४ मार्च २०२६
सहकार चळवळीतील ज्येष्ठ नेते, खांडगावच्या विकासाचे शिल्पकार व श्री. खांडेश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त
स्व. नबाजी रभाजी पा. गुंजाळ
यांना
भावपूर्ण श्रध्दांजली
– दशक्रिया विधी –
शुक्रवार दि. १३ मार्च २०२५ रोजी, सकाळी ०८.३० वा. होईल.
ठिकाण :- श्री. खांडेश्वर सांस्कृतिक भवन खांडगाव, ता. संगमनेर
शोकाकुल
गं.भा. राधाबाई नबाजी गुंजाळ (पत्नी)
गं. भा. भिमाबाई यादवराव हासे (बहिण)
गं. भा. सत्यभामा भाऊराव रहाणे (बहिण)
श्री. किसनराव लक्ष्मण गुंजाळ (भाऊ)
श्री. लहानभाऊ लक्ष्मण गुंजाळ (भाऊ)
श्री. भाऊसाहेब लक्ष्मण गुंजाळ (भाऊ)
श्री. तुकाराम लक्ष्मण गुंजाळ (भाऊ)
श्री. रावसाहेब लक्ष्मण गुंजाळ (भाऊ)
श्री. कारभारी रघुनाथ गुंजाळ (भाऊ)
कु. शुभम सोमनाथ गुंजाळ (नातु)
कु. सर्वेश नानासाहेब गुंजाळ (नातु)
सौ. शोभा व श्री सोमनाथ नबाजी गुंजाळ
सौ. सविता व श्री. नानासाहेब नबाजी गुंजाळ
सौ. परिघा व श्री. भागवत तुकाराम दिघे
सौ. अनिता व श्री डॉ. राजेंद्र मोहनराव आभाळे
सौ. ललिता व श्री जनार्धन म्हतारबा आहेर
सौ. वंदना व श्री. मनोज विश्वनाथ वर्पे
सौ. हर्षदा व श्री. संकेत सोमनाथ गुंजाळ
सौ. श्रद्धा व श्री. अमोल हरिभाऊ कांडेकर
कु. तन्वी नानासाहेब गुंजाळ (नात)
कु. अनुष्का नानासाहेब गुंजाळ (नात)
* प्रवचन सेवा *
ह.भ.प. महंत उद्धवजी महाराज मंडलिक (नेवासेकर)
समस्त गुंजाळ परिवार व आप्तेष्ट
स्व. नबाजी रभाजी पा. गुंजाळ यांची विशेष श्रद्धांजली पुरवणी पान ४,५ वर प्रकाशीत करण्यात आली आहे.

# संपादकीय...

## जागतिक व्यापाराच्या केंद्रस्थानी उभे राहणारे आखाती देश

मे २०११ मध्ये अरब स्प्रिंगनंतर अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी मध्यपूर्वेतील बदलत्या परिस्थितीवर भाष्य करताना एक महत्त्वाची गोष्ट अधोरेखित केली होती. काही देशांना तेल आणि वायूच्या संपत्तीचा मोठा आशीर्वाद मिळाला असला तरी केवळ जमिनीतून बाहेर पडणाऱ्या संसाधनांवर आधारित विकास दीर्घकाळ टिकू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले होते. ज्ञान, नवोपक्रम आणि आधुनिक अर्थव्यवस्थेच्या बळावरच भविष्यातील विकास शक्य आहे, असे तेव्हा त्यांनी सांगितले होते. त्या वक्तव्याला आता एक दशकाहून अधिक काळ लोटला असला तरी आज आखाती अरब देशांनी त्या विचाराला प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यास सुरुवात केली आहे. गेल्या पंधरा वर्षांत आखाती प्रदेशात आधुनिक इतिहासातील सर्वात महत्त्वाकांक्षी आर्थिक परिवर्तन सुरू झाले आहे. पूर्वी केवळ तेलसंपत्तीवर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था आता व्यापार, वाहतूक, पर्यटन, वित्तीय सेवा आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने विस्तारत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार २०२६ मध्ये गल्फ को-ऑपरेशन कौन्सिल अर्थात जीसीसी देशांची अर्थव्यवस्था सुमारे ४.२ टक्के दराने वाढण्याची शक्यता आहे. ही वाढ जागतिक सरासरीपेक्षा जास्त असून त्यामागे तेल नसलेल्या क्षेत्रांचे योगदान वाढत असल्याचे स्पष्ट दिसते. या परिवर्तनाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे विमान वाहतूक क्षेत्र. दुबई, दोहा आणि अबुधाबी या शहरांनी जागतिक विमान वाहतुकीचे महत्त्वाचे केंद्र म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. एमिरेट्स, कतार एअरवेज आणि एतिहाद एअरवेज या विमान कंपन्या केवळ प्रवासी सेवा देत नाहीत तर त्या त्यांच्या देशांच्या आर्थिक आणि धोरणात्मक शक्तीचे प्रतीक बनल्या आहेत. हब-अँड-स्पोक मॉडेलच्या माध्यमातून या विमान कंपन्यांनी पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा एक प्रभावी हवाई कॉरिडॉर तयार केला आहे. परिणामी आशिया, युरोप, आफ्रिका आणि अमेरिका या सर्व खंडांमधील प्रवासासाठी आखाती विमानतळ प्रमुख केंद्र बनले आहेत. या क्षेत्रात आर्थिक लाभही मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. २०२६ मध्ये मध्यपूर्वेतील विमान कंपन्यांना जागतिक स्तरावर सर्वाधिक निव्वळ नफा मिळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. प्रति प्रवासी नफ्याच्या बाबतीतही या कंपन्या आघाडीवर आहेत. आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेनुसार यामागे या प्रदेशाचे जागतिक कनेक्टिंग हब म्हणून असलेले धोरणात्मक स्थान आणि अनुकूल व्यावसायिक वातावरण कारणीभूत आहे. दुबईतील अल मकतुम आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तार किंवा रियाधमध्ये उभारले जात असलेले किंग सलमान आंतरराष्ट्रीय विमानतळ यांसारखे प्रकल्प या महत्त्वाकांक्षेची साक्ष देतात. आखाती देशांचा विस्तार केवळ आकाशापुरता मर्यादित नाही. समुद्री व्यापारातही या देशांनी प्रभावी पावले उचलली आहेत. दुबईतील जेबेल अली बंदर जगातील सर्वात व्यग्र कंटेनर बंदरांपैकी एक मानले जाते. सौदी अरेबियातील किंग अब्दुल्ला बंदराने अल्पावधीतच कार्यक्षमतेच्या बाबतीत आघाडी घेतली आहे. कतारचे हमाद बंदरही प्रादेशिक व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे. या बंदरांच्या माध्यमातून आखाती देशांनी आशिया, आफ्रिका आणि युरोप यांना जोडणारे सागरी नेटवर्क निर्माण केले आहे. यासोबतच हे देश जागतिक बंदरांमध्येही गुंतवणूक करत आहेत. दुबईस्थित डीपी वर्ल्डसारख्या कंपन्यांनी जगभरातील अनेक बंदरांचे संचालन हाती घेतले आहे. बांगलादेशातील चितगावच्या कंटेनर टर्मिनलचे व्यवस्थापन किंवा युरोपमधील टर्मिनल्समध्ये केलेली गुंतवणूक ही जागतिक व्यापाराच्या धमन्यांमध्ये आखाती देशांचे वाढते स्थान दर्शवते. जमिनीवरील दळणवळणाच्या बाबतीतही अनेक महत्त्वाचे प्रकल्प सुरू आहेत. गल्फ को-ऑपरेशन कौन्सिल रेल्वे नेटवर्क हा त्यातील सर्वात महत्त्वाचा प्रकल्प मानला जातो. सुमारे दोन हजार किलोमीटर लांबीचे हे रेल्वे जाळे सहा सदस्य देशांना जोडेल आणि भविष्यात मोठ्या प्रमाणावर मालवाहतूक सुलभ करेल. बहारीन आणि सौदी अरेबियाला जोडणारा किंग हमाद कॉजवे प्रकल्पही प्रादेशिक कनेक्टिव्हिटीला नवे परिमाण देणारा ठरू शकतो. आधुनिक काळातील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे डिजिटल पायाभूत सुविधा. आखाती देशांनी सबसी केबल नेटवर्क, डेटा सेंटर्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक सुरू केली आहे. अब्जावधी डॉलर खर्च करून उभारली जाणारी ही डिजिटल रचना भविष्यातील तंत्रज्ञानाधारित अर्थव्यवस्थेचा पाया ठरू शकते.

# ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांसाठी सर्वतोपरी सहकार्य करू – आ. तांबे



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर येथील ज्येष्ठ नागरिक महासंघाच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित नगरपालिकेतील नगरसेविका व कर्तृत्ववान महिलांच्या सन्मान सोहळ्यात आ. सत्यजित तांबे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका मांडत सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. आ. तांबे म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक ही समाजाची अमूल्य ठेव आहे. त्यांचे ज्ञान, अनुभव आणि मार्गदर्शन समाजासाठी नेहमीच उपयुक्त ठरते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न अत्यंत महत्त्वाचे असून, त्याबाबत तातडीने कार्यवाही करून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. तसेच सामूहिक व संघटनात्मक प्रश्नांच्या संदर्भातही नियोजनपूर्वक मदत केली जाईल.

कार्यक्रमात संगमनेर ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष व आदर्श शिक्षक सोमनाथ तात्याबा कळसकर गुरुजी यांनी मनोगतात सांगितले की, संगमनेरमधील विविध ज्येष्ठ नागरिक संघटनांना एकत्र करून सामाजिक उपक्रम राबविण्याचे काम सातत्याने केले जात आहे. वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे तसेच प्रशासकीय मार्गदर्शनासाठी संगमनेर पेन्शनर भवन व नगरपालिकेने नेहरू गार्डनमध्ये उभारून दिलेल्या विरंगुळा केंद्रात नियमित बैठका घेतल्या जातात. या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना एकत्र आणून त्यांचे आयुष्य आनंदी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तालुक्याचे मार्गदर्शक माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे आणि आ. सत्यजित तांबे यांनी ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या प्रश्नांना प्राधान्य देत संगमनेर हे ज्येष्ठ नागरिकांना सहकार्य करणारे राज्यातील आदर्श शहर बनावे, अशी अपेक्षा कळसकर गुरुजी यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ नागरिक महासंघाचे कार्याध्यक्ष तथा माजी प्राचार्य ज्ञानेश्वर गोंटे यांनी केले. सूत्रसंचालन अशोकराव नवले यांनी केले, तर पुरस्काराचे वाचन नंदकिशोर बेल्हेकर व युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे यांनी केले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या आयटी विभाग प्रमुख प्रा. डॉ. बायसा गुंजाळ तसेच ग्रामीण भागातील मुलांना संगणक शिक्षण देणाऱ्या ज्योती तुकाराम हासे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांनी सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांमधील उत्साह, एकोप्याची भावना आणि परस्पर सहकार्य यामुळे संगमनेरमधील ज्येष्ठ नागरिक संघटना व त्यांचा महासंघ राज्यासाठी आदर्श ठरत आहे.


**पाहिजेत**
कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर
डिप्लोमा/ डिग्री इंजिनिअर
अनुभवास प्राधान्य
संपर्क - करवा एजन्सीज बस स्टँड मागे, संगमनेर
9422762700

**पाहिजेत**
अकाउंटंट (महिला/ पुरुष)
अनुभवास प्राधान्य
पत्ता- अकोले बायपास रोड, संगमनेर
8308111211

**पाहिजेत**
ऑफिसबॉय (शिपाई) ०१ जागा (पुरुष)
शैक्षणिक पात्रता– १०/१२ वी पास
वयमर्यादा– २० ते ४० वर्ष
इच्छुकांनी संस्था कार्यालयात लेखी अर्जासह कागदपत्र दि. १४/०३/२०२६ पर्यंत जमा करावे
संपर्क– महेश नागरी सहाकरी पतसंस्था मर्या. संगमनेर, अशोक चौक, संगमनेर फोन– ०२४२५–२२०७७७
email- mahesh.patsanstha@gmail.com

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

**बौद्ध वधू पाहिजे**
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही.
अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

**पाहिजेत**
स्कुप अँड जॉय या नामांकित कुल्फी ब्रँडसाठी खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्सिक्युटिव्ह (४ जागा)
हिंगे मिल्क अँड मिल्क प्रोडक्ट्स प्रा. लि. संगमनेर
9112069393

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
AMBERNATH BAJRANG BAHULE
TO NEW NAME AS
AMBARNATH BAJARANG BAHULE
BY AFFIDAVIT NO- 320/2026
DATE 11/03/2026

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SANAPA SACHIN MALANI
TO NEW NAME AS
SAPANA SACHIN MALANI
BY AFFIDAVIT NO- 318/2026
DATE 11/03/2026

**CHANGE IN NAME**
I AM CHANGING MY NAME FROM, **MOHAMMAD ZAID RAFIK BAGWAN** TO **ZAID RAFEEQUE BAGWAN**, FOR PASSPORT ISSUANCE.
**AFFI.NO-** 2552242021268101226383
**DATE-** 11-03/2026.
FROM-
ZAID RAFEEQUE BAGWAN,
**A/P-** BAGWANPURA, SANGAMNER, DIST- A. NAGAR.

**नावात बदल**
मी, निता विजय कालेकर, मु - कुरकुटवाडी पो.- बोटा, ता. संगमनेर, अहिल्यानगर याद्वारे कळवू इच्छिते कि, माझे पूर्वाश्रमीचे नाव **संगीता रावसाहेब हासे** असे होते लग्नानंतर माझे नाव बदलून **निता विजय कालेकर** असे केले आहे. **संगीता रावसाहेब हासे आणि निता विजय कालेकर** या दोन्ही नावे एकाच व्यक्तीची म्हणजेच माझीच आहेत, भविष्यात मला **निता विजय कालेकर** या नावाने ओळखले जावे.


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहमगदनगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com — दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५१८/२०२६ — दिनांक – २५/०२/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती फरजाना अब्दुल चौगुले, रा. कुरकुंडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २७/०१/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. कुरकुंडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे फरजाना अब्दुल चौगुले, यांचा जन्म मौजे कुरकुंडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २५/०३/२०२४ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कुरकुंडी, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कुरकुंडी, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहमगदनगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com — दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५११/२०२६ — दिनांक – १७/०२/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री अब्दुल सकुर कासम पटेल रा. कुरकुंडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २७/०१/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. कुरकुंडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे अब्दुल सकुर कासम पटेल यांचा जन्म मौजे कुरकुंडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २१/०६/१९६९ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कुरकुंडी, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कुरकुंडी, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


CorelDRAW
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005




卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
MALPANI
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण–गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

**धन्वंतरी** मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

त्वरीत पाहिजेत
सेल्सपर्सन ०६ जागा
(अनुभवी पुरुष / महिला) आकर्षक पगार व सवलती
संपर्क – 75882 49849, 9860444881
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर, ०२४२५, ७५८८२४९८४९

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ — एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ — कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ — अनुभव असल्यास प्राधान्य
घरकाम करणारी महिला- १ — सर्व घरकाम
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन – २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता– प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन, कॅशियर, स्टोअर मॅनेजर, फ्लोअर मॅनेजर, हेल्पर, सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ / १२ ते ९
9511238422

**पाहिजेत**
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

**सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत**
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

**ड्रायव्हर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ऑसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर – ०२
सेल्यमन – ०२
ड्रायव्हर – ०२
दुकान काम व शोरुमसाठी – ०२ जागा
महिला कामगार – ०२
9822097904


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# पेमगिरी शहागड संवर्धनासाठी दीर्घकालीन आराखडा तयार करा; आ. अमोल खताळ




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील ऐतिहासिक शहागड किल्ल्याच्या संवर्धनासाठी राज्य शासनाने दीर्घकालीन विकास आराखडा तयार करण्यात यावा, तसेच संपूर्ण महाराष्ट्रा मध्ये २८ ऑगस्ट हा दिवस हिंदवी स्वराज्य संकल्प दिन म्हणून साजरा करण्यात यावा,अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी राज्याच्या अर्थ संकल्पीय अधिवेशनात सरकारकडे केली.

संगमनेर तालुक्यातील पेमगिरी (शहागड) ऐतिहासिक दुर्गाचे पुरेसे जतन व संवर्धन होत नसल्याने हा अमूल्य वारसा दुर्लक्षित अवस्थेत आहे. योग्य नियोजन आणि संवर्धन न झाल्यास या ऐतिहासिक ठेव्याचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. शहागडाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारने दीर्घकालीन विकास आराखडा तयार करावा,अशी मागणी करताना पुरातत्व, सांस्कृतिक आणि पर्यटन विभागांनी समन्वय साधावा, असेही त्यांनी सुचविले. किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व जपत त्या दुर्गाचे संवर्धन करावे तसेच पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक सुविधा विकसित करून या स्थळाला ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून विकसित करावे, असेही त्यांनी सभागृहात स्पष्ट केले.

पेमगिरी येथील शहागडाच्या इतिहासाबद्दल स्थानिक नागरिकांत जागरूकता निर्माण होईल तसेच पर्यटन वाढून परिसरा च्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या इतिहासाची आणि स्वराज्याच्या प्रेरणेची ही पवित्र भूमी जपणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगत सरकारने या प्रमुख मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे, असे ही आमदार अमोल खताळ यांनी यावेळी सांगितले.

# बनावट दिव्यांग प्रमाणपत्र - जि.प. चे शिक्षकासह १५ कर्मचारी निलंबित, ८ जणांवर गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्हा रूग्णालयात केलेल्या दिव्यांग वैद्यकीय पडताळणीत दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा कमी आढळल्याने जिल्हा परिषदेच्या १५ कर्मचाऱ्यांवर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. यात ११ शिक्षक, ३ परिचर, तर एका आरोग्य सेवकाचा समावेश आहे. यातील आठ जणांची नियुक्तीच दिव्यांग प्रमाणपत्रावर असल्याने त्याच्यावर थेट फौजदारी कारवाई होणार आहे.

राज्यातील सर्वच शासकीय विभागांतील दिव्यांग कर्मचारी तपासणीचे आदेश दिव्यांग मंत्रालयाचे सचिव तुकाराम मुंडे यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये दिले होते. याबाबतचे वृत्त सर्वप्रथम 'सार्वमत'ने प्रसिध्द केले होते. दरम्यान, नगर जिल्ह्यात अनेक



शिक्षक बदलीसाठी झाले लुळे पांगळे, घटस्फोटी झाल्याचे यापूर्वी 'सार्वमत'ने प्रसिध्द केले होते. दरम्यान अपंगाच्या पडताळणीबाबत राज्य पातळीवरून दिव्यांग विभागाचे सचिव मुंडे यांनी तपासणीचे आदेश काढले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेने तालुकानिहाय शिबिरे घेऊन दिव्यांग कर्मचाऱ्यांची तपासणी केली. त्यातून काही कर्मचारी जिल्हा रूग्णालयात, तर काही कर्मचारी नाशिक येथील उपसंचालक कार्यालयाकडे वैद्यकीय तपासणीसाठी पाठवले होते. दरम्यान, जिल्हा रूग्णालयाने या कर्मचाऱ्यांना बोलावून प्रत्यक्ष तपासणी केली. त्यात १८ कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांचे प्रमाण ४० टक्केपेक्षा कमी आढळले. तसा अहवाल जिल्हा रूग्णालयाने जिल्हा परिषदेला पाठवला. जिल्हा परिषदेने या कर्मचाऱ्यांना नोटिसा पाठवून खुलासा मागवला. १८ पैकी १५ जणांचा खुलासा समाधानकारक नसल्याने त्यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी बुधवारी दिले.

## कारवाई झालेले कर्मचारी

समाधान घुगे (आरोग्य सेवक, कर्णबधीर व कायदेशीर कारवाईस पात्र), सुनील वाघ (मुख्याध्यापक, कर्णबधीर), प्रभाकर चोखंडे (परिचर, अस्थिव्यंग), दत्तात्रय फपाळे (मुख्याध्यापक, कर्णबधीर), वामन घाटपांडे (परिचर, अस्थिव्यंग व कायदेशीर कारवाईस पात्र), अतुल सातपुते (परिचर, अस्थिव्यंग), मंदा शिंदे (शिक्षक, कर्णबधीर व कायदेशीर कारवाईस पात्र), संगीता कद्म (शिक्षक, अस्थिव्यंग), संजयकुमार बडे (शिक्षक, अस्थिव्यंग), वर्षा अकोलकर (शिक्षक, कर्णबधीर व व कायदेशीर कारवाईस पात्र), पुष्पलता खेडकर (शिक्षक, कर्णबधीर व कायदेशीर कारवाईस पात्र), सतीश लगड (शिक्षक, अस्थिव्यंग), सागर मोरे (शिक्षक, कर्णबधीर व कायदेशीर कारवाईस पात्र), विनयकुमार वाडेकर (शिक्षक, अल्पदृष्टी व कायदेशीर कारवाईस पात्र), संतोष लष्करे (शिक्षक, कर्णबधीर व कायदेशीर कारवाईस पात्र).

# अकोले नगरपंचायतीचा थकबाकीदारांवर बडगा

## नळ कनेक्शन तोडण्यास सुरुवात

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले नगरपंचायतीने चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर मालमत्ताकराच्या थकीत व चालू मागणीची १०० टक्के वसुली करण्यासाठी विशेष अभियान हाती घेतले आहे. थकबाकीदारांविरुद्ध प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई सुरू केली आहे.

या अभियानांतर्गत नगरपंचायतीने परिसरनिहाय पथके नियुक्त केली आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारक व भोगवटादारांकडून तातडीने कर वसुली करण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रशासनाकडून थकबाकीदारांना जप्तीची तसेच पाणीपुरवठा खंडित करण्याची नोटीस दिली जात आहे. त्यानुसार सोमवार दि. ९ मार्च २०२६ पासून नळ कनेक्शन कट करण्याची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाली आहे. दरम्यान, बुधवार दि. ११ मार्च २०२६ रोजी अकोले नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी धनश्री पवार यांनी स्वतः पथकासह हासे संकुल व कारखाना रोड परिसरात भेट देऊन वसुली मोहिमेचा आढावा घेतला. त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करत नागरिकांशी संवाद साधला. शहरात रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व इतर विकासकामे राबविण्यासाठी

मालमत्ता कर हा अत्यंत महत्त्वाचा महसूल स्रोत असून नागरिकांनी वेळेत कर भरल्यास विकासाला गती मिळते. आपला कर भरणा म्हणजे शहराच्या विकासाला दिलेला थेट हातभार असल्याने सर्वांनी थकीत कर तात्काळ भरून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी पवार यांनी केले आहे. कर न भरणाऱ्यांविरुद्ध पुढील काळात जप्ती व इतर प्रशासकीय कारवाई अधिक तीव्र करण्याचा इशाराही अकोले नगर पंचायत प्रशासनाने दिला आहे.


# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवारी विविध कार्यक्रम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमृत उद्योग समूहाचे जनक स्वातंत्र्यसेनानी आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे प्रेरणास्थान असलेले सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या स्मृतिदिनानिमित्त अमृत उद्योग समूहाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दिनांक १४ मार्च २०२६ रोजी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या स्मृतीस्थळी आदरांजली कार्यक्रम तसेच ज्येष्ठ संपादक व लेखक मल्हार अरणकल्ले यांचे स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब थोरात यांच्या जीवनचरित्रावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागात सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे मोठे कार्य सहकारमहर्षी भाऊसाहेब





थोरात यांनी केले. स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतल्यानंतर त्यांनी आयुष्यभर सहकाराच्या माध्यमातून शेतकरी,कामगार आणि ग्रामीण समाजाच्या उन्नतीसाठी काम केले. जिल्हा सहकारी बँक तसेच राज्य सहकारी बँकेच्या नेतृत्वातून त्यांनी शेती आणि शेतीपूरक उद्योगांना बळ देण्याचे काम केले. ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, उद्योगविकास आणि सहकाराच्या मूल्यांची रुजवण करण्यात त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते.

सचोटी, पारदर्शकता आणि शेतकरी हिताचा ध्यास या मूल्यांवर उभा असलेला अमृत उद्योग समूह ही त्यांच्या कार्याची जिवंत परंपरा मानली जाते. सहकार क्षेत्रात आदर्श मानल्या जाणाऱ्या या कार्याचा गौरव म्हणून दरवर्षी त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

शनिवार दिनांक १४ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात स्मृतीस्थळी आदरांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी स्वातंत्र्य सेनानी भाऊसाहेब थोरात यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या सहकार चळवळीतील योगदानाचा गौरव करण्यात येणार आहे. त्यानंतर सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात ज्येष्ठ संपादक आणि लेखक मल्हार अरणकल्ले यांचे भाऊसाहेब थोरात यांच्या जीवनचरित्रावर व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानातून भाऊसाहेबांच्या कार्याचा, सहकार चळवळीतील त्यांच्या नेतृत्वाचा आणि ग्रामीण समाजासाठी त्यांनी उभ्या केलेल्या आदर्शांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच शुक्रवार, दि.१३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता, सभागृह, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, प्रशासकीय भवन येथे 'भजनसंध्या' आयोजित केलेली आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, विधान परिषदेचे माजी सदस्य डॉ.सुधीर तांबे, अमेय पब्लिकेशन्सचे प्रमुख उल्हास लाटकर, आमदार सत्यजित तांबे, ॲड.माधवराव कानवडे, सौ.दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, रणजीतसिंह देशमुख, पांडुरंग पा. घुले, बाबा ओहळ, शंकरराव खेमनर, सुधाकर जोशी, लक्ष्मणराव कुटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्यावर हल्ला



श्रीनगर (वृत्तसंस्था)

जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे संरक्षक डॉ. फारुख अब्दुल्ला यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. सुदैवानं या हल्ल्यात फारूक अब्दुल्ला थोडक्यात बचावले आहेत.

फारुख अब्दुल्ला बुधवारी (११ मार्च) जम्मूच्या ग्रेटर कैलाश भागात एका वकिलाच्या लग्नाला उपस्थित होते. लग्न समारंभ आटोपून जात असताना हल्लेखोर कमल सिंग जामवालने मागून फारुख अब्दुला यांच्या मानेवर बंदूक ठेवली. यादरम्यान, फारुख अब्दुला यांच्या सोबत असलेल्यांकडून हल्लेखोर कमल सिंग जामवालची धरपकड करण्यात आली. फारुख अब्दुल्लावर हल्ला करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे आणि त्याची चौकशी सुरू आहे. हल्लेखोराचे नाव कमल सिंग जामवाल आहे, तो जम्मूच्या पुरानी मंडी परिसरातील रहिवासी आहे. वृत्तानुसार, कमल सिंगचा जन्म १९६३ मध्ये झाला होता. जम्मूच्या जुन्या शहर परिसरात त्याची अनेक दुकाने आहेत. या दुकानांच्या भाड्याने तो आपला उदरनिर्वाह करतो. आतापर्यंतच्या चौकशीत, आरोपीने उघड केले आहे की तो २० वर्षांपासून फारुख अब्दुल्लाला मारण्याचा विचार करत होता. तो म्हणाला, मी २० वर्षांपासून फारुख अब्दुल्लाला मारू इच्छित होतो.

# संगमेश्वर मित्र मंडळ, लहित खुर्द मुंबईकरांचा स्नेह मेळावा व हळदी कुंकू समारंभ

नवी मुंबई (वृत्तसंस्था)

रविवार दि. १ मार्च २०२६ रोजी ऐरोली, नवी मुंबई येथील श्री. संगमेश्वर मुंबईकर मंडळाचा नववा स्नेह मेळावा व हळदी कुंकू समारंभ सर्व मुंबईकर परिवार, लहितकर परिवार, माहेरच्या लेकी जावई, शाब्बास सुनबाई, ज्येष्ठांच्या व लहान-थोरांच्या उपस्थितीत, आनंदात आणि उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला मंडळाचे प्रेरणास्थान, आदरणीय सुर्यभानदादा गोडसे, कार्यक्रमाचे अध्यक्ष हरिश्चंद्र नाना शिंदे, लहितचे सरपंच डॉ. किशोर गोडसे, डॉ. सुधाकर दादा शिंदे, डॉ. राजीवजी शिंदे, डॉ. कर्मवीर गोडसे यांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभले. प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. जालिंदर बाळाजी भोर साहेब (अध्यक्ष-वागळे इस्टेट डॉक्टर्स असोसिएशन, विश्वस्त- श्री साई संस्थान, शिर्डी) तर हुलवळे साहेब (प्रशासकीय अधिकारी), भगवान संपत गोडसे (PSI-Mumbai), राजुभाऊ उत्तमराव गोडसे (M/s. Excel Gas Ltd.) यांची प्रमुख उपस्थिती लाभली आणि त्यांनी उपस्थितांना संबोधित केले, तर श्री. भगवान संपत गोडसे (PSI-Mumbai) यांनी UPSC, MPSC विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याची व मार्गदर्शन करण्याची इच्छा प्रकट केली. मंडळाच्या विनंतीला मान देऊन लहितहून खास या कार्यक्रमासाठी आवर्जुन उपस्थित झालेले सन्माननीय मान्यवर - उपसरपंच राहुल गोडसे, ग्रां. पं. सदस्य, वि. वि. का. सोसोयटी चेअरमन अर्जुन दत्तु गावडे, रमेश नानासाहेब गोडसे साहेब, डॉ. सुभाष नानासाहेब गोडसे, भारत जगन्नाथ गोडसे, सौ. रेश्माताई अमोल गोडसे, आनंद भिमाजी गोडसे, जानकीराम सावळेराम जाधव, ह.भ.प. गणपत महाराज गोडसे (सर), बाळासाहेब रावजी गोडसे (सर), किरण अशोक गोडसे, विठ्ठल मिंढे, राम अण्णासाहेब गोडसे, नवनाथ भाऊसाहेब गोडसे, राम संपत गोडसे, दिलीप मुरलीधर गावडे, गणेश रामचंद्र गोडसे, मनेश कदम, योगेश गोविंद गोडसे, लक्ष्मण




दिनाजी गोडसे, किसन नामदेव गोडसे, तानाजी नामदेव मिंढे, संजय रेवबा गोडसे, अमृता भागुजी गोडसे, भाऊसाहेब देवराम गोडसे (पूणेकर), भास्कर एकनाथ गोडसे, बाळासाहेब नामदेव गोडसे, शांताराम ठकाजी गोडसे, प्रकाश लक्ष्मण गोडसे, मारुती किसन गोडसे, समिंद्र नानासाहेब गोडसे, चि. रुषिकेश मारुती गोडसे, चि. सोहम किशोर गोडसे यांच्या तसेच सौ.संगीता बाळासाहेब गोडसे, सौ. सुरेखा भारत गोडसे, सौ.कविता राम गोडसे, सौ.आशाबाई संदिप गोडसे, सौ.निलम समिंद्र गोडसे, सौ. मंगल राजेंद्र लांडे, सौ.जयश्री संतोष गोडसे व कु. अनुष्का राम गोडसे यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रम देदिप्यमान झाला. या कार्यक्रमाला श्री. विजय फटांगरे, रविंद्र फापाळे, शरद ढोकरे, श्रेयस राजापुरकर, अक्षय दिघे, संदिप नाईकवाडी, मधुकर नवले, अनुज वामन हे जावई ही उपस्थित होते.

या प्रसंगी श्री. बाळासाहेब रावजी गोडसे (सर), अर्जुन गावडे, उल्हास गोडसे साहेब(ए. ढऊज, जिल्हा सहकारी बैंक), डॉ सुभाष गोडसे, भारत गोडसे, सौ. रेश्मा गोडसे मैडम, आनंद भिमाजी गोडसे, जानकीराम सावळेराम जाधव, ह.भ.प. गणपत महाराज गोडसे (सर) यांनी अनेक विषयांवर, मनमोकळेपणाने मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी श्री. उल्हास गोडसे साहेब(ए. ढऊज, जिल्हा सहकारी बैंक) यांचा वाढदिवसही सर्वांच्या उपस्थितीत साजरा करण्यांत आला, जो सर्वांच्या सदैव स्मरणात राहील.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच श्री. विजय गोडसे यांनी प्रास्ताविकामध्ये मंडळाबद्दलची माहिती व मान्यवरांची थोडक्यात ओळख करुन दिली होती. मंडळाचे धडाडीचे कार्यकर्ते श्री. राजु रंगनाथ गोडसे, आनंद एकनाथ गोडसे, अशोक नामदेव गोडसे, राजकुमार दादा गोडसे, मंगेश माधव गोडसे, राजेंद्र तुकाराम गोडसे, संदिप अमृता गोडसे, चंद्रकांत गंगाधर गोडसे यांनी या कार्यक्रमाची धुरा सांभाळली. मंडळाचे नवतरुण कार्यकर्ते - श्री. दौलत शिवाजी मिंढे, परेश आनंद गोडसे, आदित्य विजय गोडसे, स्वप्निल राजेंद्र गोडसे, आशुतोष राजु गोडसे, साहिल राजकुमार गोडसे यांनी हा कार्यक्रम ख-या अर्थाने पूर्णत्वास नेला व या तरुणांचं नेतृत्व म्हणजे आदर्श व्यक्तिमत्व श्री. अंकुश बाळासाहेब गोडसे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वरिष्ठांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यांसाठी त्यांचा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यांत आला, यावर्षीचे मानकरी ठरले - श्रीमती सरुबाई नामदेव मिंढे, श्रीमती सिंधुबाई जगन्नाथ गोडसे, श्री. गेणूभाऊ रामभाऊ गोडसे, डॉ. श्री. कर्मवीर धोंडिभाऊ गोडसे, श्री. अमृता भागुजी गोडसे, श्री. गंगाधर दगडू गोडसे आणि श्री. भाऊपाटील देवराम गावडे.

श्री संगमेश्वर मित्र मंडळातील महिलांचंही फार मोठं योगदान या कार्यक्रमासाठी राहिलं, यामध्ये महिलांनी लहितमधील मुंबईमध्ये वास्तव्यास असणा-या सर्व माहेरच्या लेकींना फोन करुन, थक-ढड-झझ वरुन निमंत्रणं पाठविली होती आणि म्हणूनच या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात माहेरच्या लेकींची उपस्थिति पाहायला मिळाली, त्याचबरोबर सौ. अश्विनी अशोक गोडसे यांनी इतर महिलांच्या साथीने सांस्कृतिक व पैठणी कार्यक्रम, लहान मुलांच्या फैन्सी ड्रेस स्पर्धा घेतल्या. लहित (खुर्द) गावास माझी वसुंधरा अभियानांतर्गत नाशिक विभागातून रु. ५० लाखांचे प्रथम पारितोषिक व डॉर्फ केटल जंगल कप स्पर्धेमध्ये रु. ७५ हजारांचे पारितोषिक मिळाले या बद्दल बहुमान म्हणून मंडळातर्फे सौ. सुवर्णा चंद्रकांत गोडसे यांनी लहान मुला - मुलींचे सुंदर समूह नृत्य सादर केले, यामध्ये कुमारी प्रांजल संजय कंचार व कुमारी अस्मिता अशोक गोडसे यांच्या साथीने बाल कलाकार कु. अर्णव व मानस संदिप गोडसे, कु. यज्ञेश व लोकेश चंद्रकांत गोडसे, कु. वेद मंगेश गोडसे, कु. साईराज ढोकरे, कुमारी परी मंगेश गोडसे हे सहभागी झाले होते, तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष हरिश्चंद्र नाना शिंदे यांचे लेक जावई - श्रेया व श्रेयस राजापूरकर यांनीही सुंदर गाणी गायली, जी सर्व उपस्थितांना खूपच भावली. या निमित्त विविध स्पर्धेमधील विजत्यांना, महिलांना, फैन्सी ड्रेस स्पर्धेतील मुलांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यांत आले. या कार्यक्रमातील आकर्षक स्पर्धा होती - महिलांसाठी पैठणी स्पर्धा आणि या खेळातील विजेत्या ठरल्या सौ. श्रेया श्रेयस राजापूरकर. सर्वच विजेत्यांचे मंडळातर्फे अभिनंदन तर सहभागी झालेल्यांचे आभार. महिलांसाठीच्या हळदी-कुंकू समारंभामध्ये उपस्थित सर्व महिलांचा वाण देऊन सन्मान करण्यांत आला.

या स्नेहमेळाव्याचे कार्यक्रमाची रुपरेषा, निमंत्रण पत्रिका, ट्राफी व अथक कौशल्यपुर्ण ऐंकरिंग शांत व संयमी व्यक्तिमत्व श्री. संजय कंचार (सर) यांनी केले, तर श्री. कैलास डोळस (सर) यांनी मंडळातर्फे आभार प्रदर्शन करतांना आपल्या नेहमीच्या ओघवत्या शैलीत व सुमधुर वाणीने संपुर्ण कार्यक्रमाचा आढावा घेत उपस्थित सर्वांचे आभार मानले. सरते शेवटी श्री. रमेश नानासाहेब गोडसे साहेब यांच्या धीर गंभीर आवाजातील पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यांत आली.

शेवटी स्नेहभोजन संपवून एकमेकांचा निरोप घेतांना सभागृहातील लहितकर - मुंबईकर अक्षरश: सदगदीत झाले होते, हा मुंबईकर - लहितकरांमधील स्नेह निरंतर राहो हिच आई मुक्ताई चरणी प्रार्थना. उपस्थित सर्वांचेच श्री. संगमेश्वर मुंबईकर मंडळातर्फे अगदी मन:पूर्वक आभार व धन्यवाद.

**- श्री. विजय गोडसे, मुंबई**
**मोबा - ९९६९०१४६४५**

# सहकार चळवळीतील आधारवड कै. नबाजी

त्या हसऱ्या चेहऱ्याने नाही, कोणाला दुखावले,
मनाचा तो भोळेपणा, कधी नाही केला मोठेपणा,
उडुनी गेला अचानक प्राण,
पुनर्जन्म घ्यावा हीच आमची प्रार्थना...

## कष्ट, सहकार आणि समाजसेवेची प्रेरणादायी जीवनगाथा



**जन्म : २१ ऑगस्ट १९३९ निधन : ४ मार्च २०२६**



संगमनेर तालुक्यातील खांडगाव परिसरात शेती, सहकार, सामाजिक कार्य आणि धार्मिक क्षेत्रात आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नबाजी रभाजी गुंजाळ यांचे ४ मार्च २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरातील सहकार चळवळीतील एक प्रामाणिक, ध्येयवादी आणि जनतेशी घट्ट नाळ जुळलेले नेतृत्व हरपले. साधेपणा, कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा आणि समाजहिताची प्रबळ जाणीव ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. आयुष्यभर त्यांनी स्वतःच्या कुटुंबाबरोबरच समाजाच्या विकासासाठी सातत्याने काम केले. म्हणूनच त्यांचे आयुष्य हे अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

कै. नबाजी रभाजी गुंजाळ यांचा जन्म २१ ऑगस्ट १९३९ रोजी शेतकरी कुटुंबात झाला. ग्रामीण वातावरणात वाढताना त्यांनी कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकपणाचे महत्त्व लहानपणापासून अनुभवले. त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई रभाजी गुंजाळ या अत्यंत कष्टाळू आणि संस्कारशील स्वभावाच्या होत्या. वडिलांच्या निधनानंतर १९६३ साली कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर आली. त्या कठीण परिस्थितीतही त्यांनी धैर्याने कुटुंब उभे केले आणि मुलांमध्ये चांगले संस्कार रुजवले.

मातोश्री लक्ष्मीबाई यांच्या कष्टमय जीवनातून नबाजी बाबांनी मेहनत, संयम आणि समाजासाठी जगण्याची प्रेरणा घेतली. त्यांच्या आयुष्याचा पाया या संस्कारांवरच उभा राहिला.

मे १९६३ मध्ये आंबड येथील सखाराम शिवा भोर यांची कन्या राधाबाई यांच्याशी नबाजी बाबांचा विवाह झाला. या दाम्पत्याने अत्यंत साधेपणाने संसाराची सुरुवात केली. कष्ट आणि प्रामाणिकपणाच्या बळावर त्यांनी आपला संसार उभा केला.

त्यांना दोन मुले आणि चार मुली असा सहा अपत्यांचा मोठा परिवार लाभला. यात ज्येष्ठ पुत्र सोमनाथ गुंजाळ, दुसरे नानासाहेब गुंजाळ, मुली परिघा, अनिता, ललिता आणि वंदना यांचा समावेश आहे. कुटुंबातील सर्व मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. मातोश्री लक्ष्मीबाई यांनी नातवंडांच्या शिक्षणासाठी संगमनेर येथे राहण्याची सोय करून दिली. त्यामुळे सर्व मुलांनी शिक्षण घेऊन आपापल्या क्षेत्रात प्रगती साधली. नबाजी बाबांच्या कुटुंबात एकोपा, परस्पर सहकार्य आणि संस्कारांची परंपरा आजही कायम आहे. १९६८ च्या सुमारास कुटुंब विभक्त झाल्यानंतर नबाजी बाबांवर अनेक जबाबदाऱ्या आल्या. त्या काळात शेतीसाठी आधुनिक साधने नव्हती. तरीही त्यांनी जिद्दीने काम करत शेती उभी केली. मोटा लावणे, इंजिनद्वारे पाणी देणे, मेंढ्या चारणे अशा विविध कामांमधून त्यांनी कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. १९७२ मध्ये त्यांनी ट्रॅक्टर खरेदी करून शेतीत आधुनिकतेचा पाया घातला. त्या काळात ग्रामीण भागात ट्रॅक्टर असणे ही मोठी गोष्ट मानली जात होती. त्यांनी स्वतः ट्रॅक्टर चालवत जमीन सपाट केली आणि शेती सुधारली. १९७४ मध्ये धांदरफळ परिसरात सुमारे साडेअकरा एकर जमीन खरेदी केली. सुरुवातीला ती जमीन माळरान स्वरूपात होती. परंतु नबाजी बाबांनी अथक परिश्रम करून ती सुपीक बनवली. प्रवरा नदीवरून पाईपलाईन टाकून त्यांनी त्या जमिनीला पाणी उपलब्ध करून दिले आणि संपूर्ण जमीन बागायतीत रूपांतरित केली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे त्या काळात त्यांना प्रगतिशील शेतकरी म्हणून ओळख मिळाली. नबाजी बाबांनी केवळ स्वतःच्या कुटुंबाची प्रगती साधण्यावर भर दिला नाही, तर गावातील शेतकरी आणि सर्वसामान्य लोकांच्या विकासासाठीही त्यांनी काम केले. १९७८ मध्ये त्यांनी खांडगाव दूध संस्थेचे संस्थापक चेअरमन म्हणून जबाबदारी स्वीकारली. त्या काळात दूध व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा आधार होता.

१९८२ ते १९९६ या कालावधीत त्यांनी डेअरीचे चेअरमन म्हणून अत्यंत प्रामाणिकपणे काम केले. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची प्रगती झाली. सहकाऱ्यांच्या मदतीने डेअरीची इमारत उभारण्यात आली आणि दूध व्यवसायाला बळ मिळाले. त्यांनी अनेक पदांवर काम करत सामाजिक जबाबदारी पार पाडली. त्यांनी संस्थापक चेअरमन खांडगाव दूध संस्था, सदस्य, खांडगाव विकास सेवा सोसायटी, सदस्य, खांडगाव तंटामुक्ती समिती, संस्थापक विश्वस्त, श्री खांडेश्वर मंदिर ट्रस्ट, संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, संगमनेर, विशेष कार्यकारी दंडाअधिकारी, अध्यक्ष, महसूल समन्वय समिती, संस्थापक संचालक, अमृतेश्वर विद्यालय, संगमनेर खुर्द या सर्व पदांवर काम करताना त्यांनी नेहमी पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा जपला. नबाजी बाबांना शिक्षणाचे महत्त्व पूर्णपणे पटले होते. म्हणूनच त्यांनी शिक्षण संस्थांच्या उभारणीत सक्रिय भूमिका घेतली. १९८३ मध्ये स्व. भाऊसाहेब थोरात यांच्या पुढाकाराने संगमनेर खुर्द येथे सुरू झालेल्या अमृतेश्वर विद्यालयाच्या स्थापनेत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. संस्थापक सदस्य म्हणून त्यांनी अनेक वर्षे या संस्थेच्या कार्यात सहभाग घेतला.

त्यांच्या मते शिक्षणामुळेच समाज प्रगती करू शकतो. म्हणूनच त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले.

नबाजी बाबा हे धार्मिक वृत्तीचे आणि अध्यात्मिक विचारांचे होते. खांडेश्वर मंदिराच्या विकास कार्यात त्यांनी संस्थापक विश्वस्त म्हणून महत्त्वाची भूमिका निभावली. मंदिराच्या विकासासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले. गावातील हनुमान मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी त्यांनी गावकऱ्यांना एकत्र आणून मोठे काम केले. धार्मिक कार्यातून समाजात एकोपा आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याचा त्यांचा प्रयत्न होता. नबाजी बाबा हे वारकरी संप्रदायाचे निष्ठावान अनुयायी होते. संत परंपरेबद्दल त्यांना अपार श्रद्धा होती. ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज, ह.भ.प. रामराव महाराज ढोक, ह.भ.प. अरुणजी महाराज, महंत उध्दवजी महाराज मंडलीक, ह.भ.प. गणेश महाराज ओझरकर, ह.भ.प. राजा महाराज वैजापूर आणि ह.भ.प. कल्याण महाराज पवार अशा अनेक संतांचा त्यांना सहवास लाभला. त्याचबरोबर त्यांना चांगला मित्र परिवार देखील लाभला. यात लहानुभाऊ गुंजाळ, भिमाजी- कोंडाजी, अण्णाभाऊ गुंजाळ, विठ्ठलबाबा गोसावी व नबाजी बाबा यांची तर पक्की मैत्री होती. त्या काळात गावातील लोक त्यांना पाच पांडव म्हणून संबोधत असत. गंगाधर भोकनळ हे देखील त्यांच्या मित्रा पैकी एक जवळचे मित्र होते. त्याचबरोबर खांडेश्वर मंदिर विश्वस्त असणारे त्र्यंबक अरगडे, निवृत्ती महादेव गुंजाळ, भाऊपाटील गुंजाळ, अण्णाभाऊ, शंकर गोसावी, दशरथ बालोडे, शिवराम किसन गुंजाळ हे जुने सहकारी त्यानंतर परशुरामभाऊ, भास्कर पाटील, रावसाहेब, त्र्यंबक महादेव गुंजाळ , ॲड. मधुकरराव गुंजाळ, विठ्ठल आप्पा गुंजाळ, डॉ. नामदेव गुंजाळ, ॲड. विठ्ठल भाऊपाटील गुंजाळ, विठ्ठल बाबा गोसावी, लक्ष्मण त्रिंबक गुंजाळ, भागवत अरगडे आणि मी स्वतः अशोक आप्पासाहेब गुंजाळ आशा आम्हा सर्वांना त्यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले.

नबाजी बाबांनी समाजातील विविध प्रश्नांवर नेहमीच सक्रिय भूमिका घेतली. यात मीटर हटाव चळवळ आणि रुमणे मोर्चा अशा विविध चळवळींमध्ये त्यांनी सहभाग घेतला. नदीकाठावरील वीज कनेक्शन तोडण्याच्या निर्णयाविरोधात त्यांनी गावकऱ्यांना एकत्र आणून आंदोलन केले. समाजातील अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. त्यांच्या प्रगतिशील शेती आणि समाजकार्यासाठी त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यात १७ डिसेंबर २०१६ रोजी अहमदनगर जिल्हा परिषद कृषी विभागाचा प्रगतशील शेतकरी पुरस्कार, ५ सप्टेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार सेवा संघ पुरस्कारांचा समावेश आहे.

हे पुरस्कार त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टांचे आणि कार्याचे प्रतीक होते. त्यांचे सुपुत्र सोमनाथ गुंजाळ हे खांडगाव ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच म्हणून तसेच विद्यमान सदस्य म्हणून काम करत आहेत. तसेच लक्ष्मी ग्रामीण बिगरशेती पतसंस्था आणि संगमनेर ॲग्री ट्रान्सपोर्ट संस्थेत ते संचालक आहेत. गावातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यात ते सक्रिय असतात.

दुसरे सुपुत्र नानासाहेब गुंजाळ आधुनिक पद्धतीने शेती आणि दुग्ध व्यवसाय सांभाळत आहेत. कुटुंबातील सर्व मुली व जावईही आपापल्या क्षेत्रात उत्तम कार्य करत आहेत. पत्नी राधाबाई गुंजाळ यांनी १९९९ ते २०१० या कालावधीत सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका म्हणून काम केले आहे. नबाजी बाबांच्या शेवटच्या काळात अनेक डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार केले आणि सेवा दिली. डॉ. भरत पाटील, डॉ. ढोकरे, डॉ. मनोज गुलानी, जावई डॉ. राजेंद्र आभाळे, डॉ. राधेश्याम गुंजाळ आणि डॉ. सुधाकर गुंजाळ यांच्याप्रती कुटुंबीयांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. कै. नबाजी रभाजी गुंजाळ यांनी आयुष्यभर कष्ट, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेचा मार्ग स्वीकारला. शेती, सहकार, शिक्षण, धार्मिक कार्य आणि सामाजिक चळवळी या सर्व क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या कार्याचा प्रभाव अनेकांच्या जीवनावर पडला. त्यांचे आयुष्य हे पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श आहे. त्यांच्या स्मृती गावाच्या विकासात आणि समाजकार्यात कायम जिवंत राहतील.

कै. नबाजी रभाजी गुंजाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

शब्दांकन –
**रमेश लहानुभाऊ गुंजाळ**
**(संचालक, संगमनेर तालुका दूध संघ)**
**अशोक आप्पासाहेब गुंजाळ**
**( सचिव, श्री खांडेश्वर मंदिर ट्रस्ट, खांडगाव**


सहकार चळवळीतील आधारवड
**कै. नबाजी रभाजी गुंजाळ**
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
**ग्रामपंचायत कार्यालय, खांडगाव**
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
ॲड. श्री. विकास रावसाहेब गुंजाळ –सरपंच
श्री. रूपवते सुनिल लक्ष्मण – उपसरपंच
श्रीमती यु. एस. नवले – ग्रामसेविका
- सदस्य मंडळ-
श्री. सोमनाथ नबाजी गुंजाळ, श्री. भरत भिमाशंकर गुंजाळ,
सौ. लक्ष्मीबाई संपत गुंजाळ, श्री. रमेश विश्वनाथ अरगडे,
सौ. गंगा प्रभाकर गुंजाळ, सौ. अनिता आप्पासाहेब गुंजाळ,
सौ. खरे शोभा लक्ष्मण, सौ. नयना विलास गुंजाळ,
सौ. पद्मावती संजय गुंजाळ,
कर्मचारी वृंद – तुकाराम रावजी गुंजाळ (लिपीक),
श्री विठ्ठल संभाजी गुंजाळ (परीचर)
श्री. कैलास काशिनाथ अरगडे (पा.पु.कर्मचारी)
सौ. कोमल रोहीत गुंजाळ (संगणक परिचालक)
सर्व ग्रामस्थ खांडगाव



सहकार चळवळीतील आधारवड
**कै. नबाजी रभाजी गुंजाळ**
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
**लक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या; खांडगाव**
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
श्री. संजय दत्तात्रय गुंजाळ –चेअरमन
श्री. रामनाथ बाबुराव गुंजाळ – व्हा. चेअरमन
श्री. खंडेराव रामचंद्र वर्पे – व्यवस्थापक
- संचालक मंडळ-
श्री. रमेश लहानुभाऊ गुंजाळ, श्री.सोमनाथ नबाजी गुंजाळ,
श्री. पोपट रावसाहेब गुंजाळ, श्री. प्रविण शिवाजी गुंजाळ,
श्री. संतोष परशराम गुंजाळ, श्री. मच्छिंद्र किसनपुरी गोसावी,
श्री. धनंजय दादासाहेब रूपवते, श्री. विठ्ठल भाऊराव गुंजाळ,
श्री. मनोहर लहानु गुंजाळ, श्री. दत्तात्रय विठोबा बालोडे,
श्री. सुधाकर मनोहर गुंजाळ, श्री. सिंधुबाई सखाराम काळे,
सौ. लहानबाई भाऊसाहेब ढगे
**सर्व सभासद, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, खांडगाव**



सहकार चळवळीतील आधारवड
**कै. नबाजी रभाजी गुंजाळ**
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
**खांडेश्वर शेतकरी साधन सहकारी संस्था मर्या; खांडगाव**
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
श्री. बाजीराव आनंदा गुंजाळ –चेअरमन
श्री. रमेश मारूती गुंजाळ – व्हा. चेअरमन
- संचालक मंडळ-
श्री. कपिल सुधाकर गुंजाळ, श्री. महेश साहेबराव गुंजाळ,
श्री. दगडू लक्ष्मण वर्पे, श्री. कैलास वसंत गुंजाळ,
श्री. गणेश भास्कर गुंजाळ, श्री. रमेश दामु रूपवते,
श्री. भानुदास त्रिंबक गोसावी, सौ. अलका नामदेव गुंजाळ,
सौ. निर्मला भाऊसाहेब गुंजाळ, श्री. रमेश लहानभाऊ गुंजाळ,
श्री. संजय दत्तात्रय गुंजाळ, श्री. रमेश संपत गुंजाळ,
श्री. प्रमोद रामभाऊ दिघे (सचिव)
**सर्व सभासद, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, खांडगाव**





सहकार चळवळीतील आधारवड
**कै. नबाजी रभाजी गुंजाळ**
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
**खांडगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्यादित, खांडगाव**
श्री. सदीप चंद्रभान गुंजाळ – चेअरमन
श्री. कैलास गोपीनाथ शिंदे – व्हा. चेअरमन
श्री. विठ्ठल तात्याबा खेमनर – सचिव
- संचालक मंडळ-
श्री. नारायण गणपत बालोडे, श्री. गंगाधर कारभारी गुंजाळ
श्री. मनोहर लहानु गुंजाळ, श्री. मधुकर बाळाजी गुंजाळ
श्री. प्रताप मारुती गुंजाळ, श्री. बाजीराव लालू रुपवते
श्री. नाना भावका आरगडे, श्री. रघुनाथ कोंडाजी गुंजाळ
श्री. सविता मच्छिंद्र गुंजाळ, श्री. रोहिणी ज्ञानदेव गुंजाळ
श्री. ज्ञानदेव शंकर गुंजाळ, श्री. राहुल रामभाऊ गुंजाळ
श्री. मंगेश विजय गुंजाळ (सेल्समन )
**सर्व सभासद व कर्मचारी वृंद, ग्रामस्थ, खांडगाव ता. संगमनेर**



सहकार चळवळीतील आधारवड
**कै. नबाजी रभाजी गुंजाळ**
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
**शिवकृपा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या; खांडगाव**
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
ॲड. श्री. मधुकर बाळाजी गुंजाळ –चेअरमन
श्री. राधाकिसन सुदाम अरगडे – व्हा. चेअरमन
- संचालक मंडळ-
श्री. त्रिंबक गंगाधर गुंजाळ, श्री. किशोर द्वारकानाथ लिंभुरे,
सौ. कमल राजाराम अरगडे, श्री. विठ्ठल दत्तु गुंजाळ,
श्री. जीवन भाऊ गुंजाळ, श्री. बाळासाहेब दशरथ गुंजाळ,
मा. सौ. सुरेखा राजेंद्र बालोडे, श्री. ज्ञानेश्वर विश्वनाथ गुंजाळ,
श्री. सुनिल दत्तु बालोडे (अकौंटंट),
श्री. ज्ञानेश्वर पांडुरंग भालेराव (व्यवस्थापक)
श्री. सुदाम ज्ञानोबा गवांदे (कॅशिअर)
श्री. सतीष भाऊसाहेब गुंजाळ (लोन ऑफिसर)
**सर्व सभासद, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, खांडगाव**



सहकार चळवळीतील आधारवड
**कै. नबाजी रभाजी गुंजाळ**
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
**गृहलक्ष्मी महिला सहकारी दुध उत्पादक संस्था मर्या; खांडगाव**
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
सौ. वंदना ज्ञानेश्वर गुंजाळ –चेअरमन
सौ. अरूणा भिमराज गुंजाळ – व्हा. चेअरमन
- संचालक मंडळ-
सौ. कौशल्या त्रिंबक गुंजाळ, सौ. सुरेखा सचिन गुंजाळ,
सौ. शोभा रामनाथ गुंजाळ, सौ. संगिता बाबासाहेब गुंजाळ,
सौ. वंदना संजय गुंजाळ, सौ. मंगल राजेंद्र बालोडे,
सौ. नंदा भाऊसाहेब गुंजाळ, सौ. चंदा विजय गुंजाळ,
सौ. मनिषा सुनिल गुंजाळ, राधा रामनाथ गुंजाळ,
सौ. शैला बाबासाहेब गुंजाळ, सौ. कमल सखाराम अरगडे
सौ. सोनाली सनिल रुपवते, सौ. विमल कारभारी गुरूकुले,
सौ. संगिता अरूण गुंजाळ (सचिव)
श्री. ज्ञानेश्वर पांडुरंग भालेराव (सह. सचिव)
श्री. खंडु रामभाऊ काळे (संकलक)
श्री. जालिंदर सखाराम अरगडे (शिपाई)
**सर्व सभासद व कर्मचारी वृंद, ग्रामस्थ, खांडगाव**



सहकार चळवळीतील आधारवड
**कै. नबाजी रभाजी गुंजाळ**
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
**खांडेश्वर सहकारी दुध उत्पादक संस्था मर्या; खांडगाव**
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
श्री. रमेश लहानुभाऊ गुंजाळ –चेअरमन
श्री. भाऊसाहेब संतु बालोडे – व्हा. चेअरमन
श्री. सुयोग लक्ष्मण वर्पे – सचिव
- संचालक मंडळ-
श्री. विठ्ठल किसन गुंजाळ, श्री. भाऊपाटील तुकाराम गुंजाळ,
श्री. नानासाहेब भवानी ढगे, श्री. मच्छिंद्र राजाराम गुंजाळ,
श्री. श्रीरंग पांडुरंग गुंजाळ, श्री. राजाराम रामनाथ सोनवणे,
श्री. उल्हास नारायण गुंजाळ, श्री. कपिल सुधाकर गुंजाळ,
श्री. माधव नागुजी शिंदे, श्री. दिलीप संपत वर्पे,
श्री. प्रशांत नानासाहेब गुंजाळ, श्री. धनराज एकनाथ गोसावी,
श्री. पांडुरंग पढरीनाथ गुंजाळ (स्वि. संचालक),
दत्तात्रय भाऊपाटील गुंजाळ, (स्वि. संचालक)
श्री. गोरक्ष सदाशिव गुंजाळ, (स्वि. संचालक)
श्री. गोपीनाथ गोविंद रूपवते, (स्वि. संचालक)
सौ. सुरेखा एकनाथ गुंजाळ, सौ. सुनिता नानासाहेब गुंजाळ,
सर्व सभासद व कर्मचारी वृंद, ग्रामस्थ, खांडगाव

# रभाजी गुंजाळ यांना साश्रूनयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली

## एक दिलदार मित्र काळाच्या पडद्याआड



बुधवार दिनांक ४ मार्च २०२६ हा दिवस आमच्या दृष्टीने अतिशय दुःखदायक व वेदनादायक ठरला. अगदी लहान वयापासून माझा जिवलग मित्र या दिवशी दीर्घकालीन आजाराने वृद्धपकालाने अनंतात विलीन झाला. नबाजीच्या बाबतीत सांगायचं झालं तर अतिशय रोखठोक, स्पष्ट वक्ता, कोणाची भीडभाड न ठेवणारा असा नबाजीचा स्वभाव होता. नबाजी आणि मी समदुःखी होतो. दोघांचेही वडील आम्ही लहान असतानाच वारले. आमच्यावर लहानपणीच कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पडल्या. किसन दादा व नबाजीचे कुटुंब विभक्त झाल्यानंतर खऱ्या अर्थानं नबाजीची आणि माझी मैत्री झाली. किसन दादा व रघुनाथ बाबा यांनी अंबडचे सखाराम शिवा भोर यांची मुलगी राधाबाई यांचे बरोबर विवाह जुळवून आणला.त्यानंतर नबाजीचा प्रपंच सुरू झाला. नबाजीने सुरुवातीच्या काळात मेंढ्या राखण्याचे सुद्धा काम केलं. सहकारी तत्त्वावर इतरांना बरोबर घेऊन वडाच्या वावरातून दोन पाईपलाईन केल्या. त्यानंतर आम्ही दोघांनी बरोबरच इंटरनॅशनल कंपनीचे ट्रॅक्टर खरेदी केले. ट्रॅक्टरने शेती करण्यास सुरुवात केली. नंतरच्या काळामध्ये आम्ही गावांमध्ये दुध डेअरीचा व्यवसाय सुरू केला. दूध डेअरीच्या इमारतीसाठी भोमाजी ढगे यांच्याकडून जागा खरेदी करून घेण्यात नबाजीची मदत झाली. डेअरीसाठी इमारत बांधली.जवळपास १२ ते १५ वर्षे नबाजींनी डेअरीचे चेअरमन पद सांभाळले. अतिशय काटकसरीने सर्वांच्या सहकार्याने डेअरीचा कारभार पाहिला. १९८२ नंतर खांडेश्वर मंदिराच्या विकासाची सूत्रे नबाजीने हाती घेतली. मंदिराच्या सभोवताली सभामंडप, पडव्या लोकवर्गणी जमा करून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. काळ खूप कठीण होता. परंतु नबाजीकडे प्रचंड चिकाटी होती. लोकांना विश्वासात घेऊन लोक वर्गणी जमा करण्यात नबाजीचा सातत्याने पुढाकार असायचा. १९८२ मध्ये खांडेश्वर मंदिर ट्रस्ट ची स्थापना झाली. मंदिर ट्रस्ट चे नबाजी संस्थापक विश्वस्त होते .तेथून पुढे मंदिराच्या विकासाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली. सर्व विश्वस्त यांनी नबाजीच्या मार्गदर्शनाखाली मंदिराच्या विकास कामाचा ध्यास घेतला. त्यामध्ये मंगल कार्यालय, भोजनालय भक्तनिवास, मंदिर परिसरात पेविंग ब्लॉक त्याचप्रमाणे नाला भिंत, पार्किंग मध्ये पेविंग ब्लॉक, शॉपिंग कॉम्प्लेक्स या सर्व सुविधांचे काम चालू असताना त्यावर बारकाईने लक्ष देण्याचं काम नबाजीने केलं. मी त्या वेळेला संगमनेर साखर कारखान्याचा व्हाईस चेअरमन होतो. सर्व जबाबदारी नबाजीकडे होती. अनेक कोरे चेकवर मी सह्या करून जायचो. परंतु सर्व हिशोब नबाजी पाहत असे.कुठल्याही प्रकारची कधी अडचण येऊन दिली नाही. गावातील विकास सेवा सोसायटी मध्येही सदस्य म्हणून नबाजींनी अनेक वर्ष काम पाहिलं. जिल्हा परिषद खांडेश्वर मळा शाळेची इमारत बांधण्यासाठी लोक वर्गणी जमा करून अक्षरशः त्या काळात तीन तीन रुपये दरडोई जमा करून त्यांनी इमारतीचे उत्तम बांधकाम त्या काळात केले. शाळेच्या इमारत जमाखर्चाचा हिशोब अण्णाभाऊ कडे असायचा. अण्णा भाऊंची नबाजी व मला खूप चांगली साथ होती. परंतु त्यांचंही १९९९ मध्ये अपघाती निधन झालं. आमचा उजवा हात निखळल्यासारखं आम्हा दोघांना झालं. खांडेश्वर हरिनाम सप्ताह असेल, त्यामध्ये नबाजींचा सक्रिय सहभाग असायचा श्रावण महिन्यामधील यात्रा, त्याचे नियोजन, दुकानांचे नियोजन या सगळ्या गोष्टींमध्ये नबाजी आपल्या सर्व सहकार्यांबरोबर पुढे असायचे. नबाजीचा परखड स्वभाव असल्यामुळे कुणीही त्यांच्या पुढे बोलण्याची हिंमत धरत नसे. परंतु एक आदर युक्त भीती नबाजी बद्दल सर्व गावाला कायम होती. १९९९ मध्ये सदगुरु गंगागिरी महाराज यांचा १५२ वा हरिनाम सप्ताह आम्ही खांडेश्वराच्या परिसरामध्ये घेतला.

त्या सप्ताहाच्या नियोजनामध्येही नबाजीचा सिंहाचा वाटा होता.प्रत्येक कामात

नबाजी माझ्याबरोबर असायचे. आमची जीवापार दोस्ती होती. स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांचे निष्ठावंत पाईक होते. तदनंतरच्या काळात आमदार बाळासाहेब थोरात यांच्या राजकारणामध्ये सातत्याने त्यांच्याबरोबर त्यांचा सक्रिय सहभाग होता. संगमनेर मार्केट कमिटी वर सुद्धा पाच वर्ष संचालक म्हणून नबाजींनी काम पाहिलं. नबाजीचं शिक्षण कमी होतं, परंतु नबाजीकडे व्यावहारिक ज्ञान मात्र प्रचंड होतं. तोंडी हिशोब करण्याची नबाजीची पद्धत खूप लक्षणीय होती. राजकारण, समाजकारण असेल आम्ही दोघांनी सातत्याने एकमेकांच्या विचाराने केले. मंदिर विकासाच्या बाबतीत त्यावेळेला क वर्ग दर्जा आणि ब वर्ग दर्जा मिळविण्यासाठी नामदार बाळासाहेब थोरात व डॉक्टर सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विकास कामाचा आराखडा करण्यात आला. त्यामध्ये सुद्धा नबाजीची मोलाची साथ आम्हाला लाभली. अनेक वर्ष आम्ही निर्जली एकादशीला पंढरपूरची वारी बरोबर केली. अनेक तीर्थयात्रा केल्या. गेल्या सात-आठ वर्षापासून नबाजीची तब्येत खालावली होती. चालण्याची अडचण होती. तरीही वॉकरवर नबाजी मंदिराकडे यायचे. मंदिर ट्रस्टच्या मीटिंगमध्ये मौलिक सूचना करायचे. हिरीरीन सर्व चर्चेमध्ये भाग घ्यायचे. मंदिर विकासाबाबत नबाजीला प्रचंड अशी तळमळ होती. सातत्याने नबाजी मंदिराच्या विकासाबद्दल विचारणा करायचे. आपल्याला भाविकांसाठी काय काय नवीन सुविधा देता येतील, याचा ते सातत्याने विचार करायचे. मंदिराचं आकर्षण कसं वाढवता येईल यावर त्यांचा भर होता. काही दिवसापासून आपल्याला खांडेश्वर मंदिराजवळ एक विठ्ठल रुक्माई चे मंदिर बांधायचे आहे अशी नबाजीची इच्छा होती.

परंतु त्याचे उत्तम नियोजन करून काही दिवसांनी उत्तम आराखडा तयार करून एक चांगल्या पद्धतीचं मंदिर बांधण्याचा आमचा निश्चित मानस आहे. आम्ही लवकरच विठ्ठल रुक्माई चे मंदिर बांधण्याचाही निर्धार करून काळाच्या ओघात नबाजीची अपूर्ण राहिलेली इच्छा पूर्ण करण्याचा सुद्धा आम्ही सर्व विश्वस्त व गावकरी यांच्या सहकार्याने निश्चित पूर्ण करण्याचा प्रयत्न करू. एक जीवाभावाचा मित्र, राजकारणातील सच्चा सहकारी, परखड स्वभावाचा जिवलग मित्र अनंतात विलीन झाला. त्याचे मला अतोनात दुःख झाले आहे. तसेच सर्व गावाला त्यांचे दुःख झालेले आहे.

त्या दुःखातून सावरण्यासाठी परमेश्वरांनी सर्वांना शक्ती देवो अशी श्री खांडेश्वर चरणी प्रार्थना करतो आणि माझ्या जिवलग मित्राला भावपूर्ण आदरांजली व्यक्त करतो.

**– लहानुभाऊ गुंजाळ**

**अध्यक्ष, श्री खांडेश्वर मंदिर ट्रस्ट, खांडगाव**

**आधार होता ज्यांचा, तो हात सुटला**
**वात्सल्याचा तो महासागर आज आटला**
**शब्दांत मांडता येणार नाही असे तुमचे व्यक्तिमत्त्व होते,**
**आमच्या जीवनातील तुम्ही सर्वात मोठे अस्तित्व होते**

आमचे वडील कै. श्री. नबाजी रभाजी पाटील गुंजाळ यांचा जन्म २१ ऑगस्ट १९३९ रोजी संगमनेर तालुक्यातील खांडगाव येथे एका कष्टकरी शेतकरी कुटुंबात झाला. वडील रभाजी (नाना) गुंजाळ, आई लक्ष्मीबाई गुंजाळ आणि बहिण सौ. भिमाबाई यादव असा त्यांचा परिवार. मामाचे गाव हिवरगाव पावसा तर मावश्या लोणी व निमगाव टेंभी येथे होत्या. शेतकरी कुटुंबात जन्म आणि त्या काळात शिक्षणाला फारसे महत्त्व नसल्यामुळे त्यांना शिक्षणाची संधी मिळाली नाही. परंतु आयुष्याने त्यांना खूप मोठे धडे दिले. वयाच्या अवघ्या चोवीसाव्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले आणि त्यांच्या खांद्यावर घराची मोठी जबाबदारी आली. आई लक्ष्मीबाई यांच्या आशीर्वादाने आणि मार्गदर्शनाने त्यांनी आयुष्याचा संघर्षमय प्रवास सुरू केला. १९६३ साली आंबड येथील सखाराम शीवा भोर यांच्या कन्या राधाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. लग्नानंतर काही काळ संयुक्त कुटुंबात संसार झाला, पण पुढे कुटुंब विभक्त झाले. तरीही पत्नी राधाबाई यांच्या खंबीर साथीने त्यांनी संसार आणि शेती दोन्ही उत्तम प्रकारे सांभाळले. त्यांच्या कष्टामुळे शेतीतून चांगले उत्पन्न मिळू लागले.

१९७२ साली दुष्काळामुळे पाण्याचा प्रश्न गंभीर झाला. ते स्वतःचा पाण्याचा प्रश्न सोडवू शकत होते, पण त्यांनी केवळ स्वतःचा विचार न करता गावातील इतर शेतकऱ्यांचाही विचार केला. सहकाराच्या माध्यमातून पाईपलाईन योजना राबवून अनेक शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सोडवला. गावाला त्यांनी नेहमी एक कुटुंब मानले. गावातील विकासकामे असोत, भाऊबंदकीची भांडणे असोत, बांधाचे वाद असोत किंवा कौटुंबिक मतभेद – ते नेहमी शांतपणे मार्गदर्शन करून प्रश्न सोडवत असत. अनेकांची घरे त्यांनी जुळवली, विवाह जमवले आणि समाजात सुसंवाद निर्माण केला.

सामाजिक कार्याबरोबरच त्यांनी राजकीय क्षेत्रातही काम केले. त्यांची राजकीय कारकीर्द स. म. भाऊसाहेब संतुजी थोरात यांच्या सहवासातून सुरू झाली. १९८५ च्या निवडणुकीत लोकनेते बाळासाहेब भाऊसाहेब थोरात यांच्या आमदारकीसाठी त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांचा स्वभाव प्रामाणिक, एकनिष्ठ, स्पष्टवक्ते, स्वाभिमानी आणि धडाडीचा होता. ते कायम स्वतःच्या विचारांवर ठाम उभे राहणारे नेतृत्व होते. औपचारिक शिक्षण नसतानाही त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यामध्ये

विशेष कार्यकारी अधिकारी, बाजार समिती संचालक, तंटामुक्ती अध्यक्ष, खांडगाव देवस्थान विश्वस्त, अमृतेश्वर

## आमचा भाऊ...

महाविद्यालय संचालक, दूध डेअरीचे १५ वर्षे संस्थापक चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य, पुलोद पक्ष अध्यक्ष, महसूल समन्वयक, पतसंस्था संचालक तसेच खांडगाव विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक अशी अनेक पदे त्यांनी भूषवली. राजकारणाबरोबरच धार्मिक कार्यातही त्यांचे मोठे योगदान होते. खांडगाव येथे प.पू. नारायणगिरी महाराज यांच्या १५२ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन त्यांनी पंचक्रोशीतील सहकाऱ्यांच्या मदतीने यशस्वी केले. गावातील अनेक देवस्थानांच्या कामात त्यांनी नेहमी पुढाकार घेतला. त्यांना दोन मुले आणि चार मुली – मोठे सोमनाथ आणि नानासाहेब, तर मुली परिघा, अनिता, ललिता आणि वंदना. आमच्या सहा भावंडांच्या शिक्षणात त्यांनी कधीही कमी पडू दिले नाही. स्वतः शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे आम्हाला मात्र त्यांनी उच्च शिक्षण घेण्याची सतत प्रेरणा दिली आणि सर्वांना उच्च शिक्षित केले. चारही जावई प्रतिष्ठित व उच्च शिक्षित घराण्यातील – भागवत दिघे (व्यवसायिक), डॉ. राजेंद्र आभाळे (वैद्यकीय व कन्स्ट्रक्शन क्षेत्र), जनार्दन आहेर (राजकीय क्षेत्रातील नावाजलेले व्यक्तिमत्त्व), मनोज वर्पे (संगमनेर सहकारी साखर कारखाना, डिस्टिलरी विभागात केमिस्ट).

दोन्ही सुना तसेच नातसुना सुसंस्कृत आणि प्रतिष्ठित घराण्यातील आहेत. त्यांनी सूनांवर आणि नातसूनांवरही मुलींसारखे प्रेम केले. नातवंडांवर त्यांचे अतूट प्रेम होते. नातवंडांसोबत ते नेहमी मित्रासारखे वागत. त्यांना शिक्षणासाठी प्रेरणा देत, बाहेर शिक्षणासाठी गेलेल्या नातवंडांची फोन करून चौकशी करत. वयाचे अंतर न जाणवू देता त्यांच्या सोबत गप्पा, सल्ला आणि प्रेमाने संवाद साधत.

**त्यांनी कुटुंबात नेहमी एकजूट ठेवली.**
**ते आमच्या कुटुंबाचा वटवृक्ष होते –**

जो स्वतः उन्हात उभा राहून कुटुंबाला मायेची शीतल सावली देतो जो वडाच्या पारंब्यांप्रमाणे नात्यांची वीण घट्ट धरून ठेवतो आणि ज्याच्या संस्कारांच्या मुळांमुळे संपूर्ण कुटुंब आयुष्यभर सुरक्षित आणि बहरलेले राहते.

**बाप या दोन शब्दांत लेकींचे आभाळ असते,**
**त्यांच्या मायेच्या सावलीत माहेरचे गोकुळ असते.**
**संकटात लढायला देतात ते हजार हत्तींचे बळ,**
**तो वटवृक्ष पाठीशी असताना कसली उन्हाची झळ?**

त्यांची आठवण, त्यांचे संस्कार आणि त्यांनी दिलेली माया आमच्या हृदयात सदैव जिवंत राहील.

**– मुले, मुली, सुना, नातवंडे व नातसुना**

सहकार चळवळीतील आधारवड
कै. नबाजी रभाजी गुंजाळ
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
संजीवनी सहकारी पाणी पुरवठा संस्था खांडगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
श्री. विजय भाऊराव गुंजाळ – चेअरमन
श्री. बबन बाबु गुंजाळ – व्हा. चेअरमन
श्री. बाबासाहेब जिजाबा गुंजाळ – सचिव
- संचालक मंडळ -
श्री. दशरथ रामभाऊ बालोडे,
श्री. भाऊसाहेब रामभाऊ बालोडे,
श्री. महेश रामभाऊ गुंजाळ,
श्री. यशवंत भिकाजी गुंजाळ
श्री. ओंकार बाळासाहेब गुंजाळ,
श्री. गंगाधर देवबा गुंजाळ
गं. भा. लक्ष्मीबाई जिजाबा गुंजाळ,
सौ. हिराबाई रखमा गुंजाळ

सहकार चळवळीतील आधारवड
कै. नबाजी रभाजी गुंजाळ
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
श्रीमती लक्ष्मीबाई गुंजाळ चॅरिटेबल ट्रस्ट खांडगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
श्री. बाबासाहेब लहानुभाऊ गुंजाळ – अध्यक्ष
श्री. रमेश लहानुभाऊ गुंजाळ – उपाध्यक्ष
श्री. अशोक आप्पासाहेब गुंजाळ – सचिव
श्री. गणेश नानासाहेब पावसे – खजिनदार
- विश्र्वस्त मंडळ-
श्री दादासाहेब लहानुभाऊ गुंजाळ
श्री.अमोल सखाराम काळे
श्री प्रशांत पंडित गुंजाळ
सौ. सोनाली बाबासाहेब गुंजाळ
सौ. ममता रमेश गुंजाळ
सौ. प्रियंका दादासाहेब गुंजाळ
सौ. उज्वला अशोक गुंजाळ
सर्व सभासद व कर्मचारी वृंद, ग्रामस्थ, खांडगाव

सहकार चळवळीतील आधारवड
कै. नबाजी रभाजी गुंजाळ
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
ओम इच्छापूर्ती कपारेखांडेश्वर शिव मंदिर, खांडगाव
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
श्री. प्रवीण प्रभाकर गुंजाळ – अध्यक्ष
श्री. सोमनाथ किसन गुंजाळ – उपाध्यक्ष
श्री. रावसाहेब रामकृष्ण गुंजाळ – खजिनदार
श्री. रामभाऊ रेवजी गुंजाळ – सचिव
- विश्र्वस्त मंडळ-
श्री. आण्णासाहेब शिवराम गुंजाळ
श्री. दत्तु जिजाबा गुंजाळ, श्री. नामदेव बाळकृष्ण गुंजाळ
श्री. गोपीनाथ यशवंत बालोडे, श्री. पांडुरंग शंकर गुंजाळ
श्री. सुनिल दत्तु बालोडे, श्री. तानाजी नारायण गुंजाळ,
श्री. महेश भास्कर गुंजाळ
सर्व सभासद व कर्मचारी वृंद, ग्रामस्थ, खांडगाव



सहकार चळवळीतील आधारवड
कै. नबाजी रभाजी गुंजाळ
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
श्री खांडेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट खांडगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
श्री. लहानुभाऊ दगडू गुंजाळ – अध्यक्ष
- विश्र्वस्त मंडळ-
श्री. ॲड. मधुकर बाळासाहेब गुंजाळ
श्री. दशरथ रामभाऊ बालोडे
श्री. रावसाहेब लक्ष्मण गुंजाळ
श्री. भास्कर पांडुरंग गुंजाळ
श्री. विठ्ठल भाऊराव गुंजाळ
श्री. ॲड. विठ्ठल भाऊपाटील गुंजाळ
श्री. नामदेव शिवराम गुंजाळ
श्री. विठ्ठल सुखदेवपुरी गोसावी
श्री. अशोक आप्पासाहेब गुंजाळ
श्री. लक्ष्मण त्र्यंबक गुंजाळ
श्री. भागवत त्र्यंबक अरगडे

सहकार चळवळीतील आधारवड
कै. नबाजी रभाजी गुंजाळ
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
मथुराबाई थोरात सहकारी दूध उत्पादक संस्था खांडगाव
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
श्री. विठ्ठलराव भाऊराव गुंजाळ – चेअरमन
श्री. भाऊसाहेब निवृत्ती गुंजाळ – व्हा. चेअरमन
श्री. संतोष भाऊसाहेब गोफणे– सचिव
- सन्माननीय संचालक मंडळ-
श्री. नवनाथ जगन्नाथ गुंजाळ, श्री. नानासाहेब शिवराम गुंजाळ,
श्री. मुरलीधर भाऊ गुंजाळ, श्री. भारत नारायण गुंजाळ,
श्री. राजेंद्र गजाबा गुंजाळ, श्री. गोपीनाथ पाटीलबा गुंजाळ,
श्री. विठ्ठल एकनाथ गुंजाळ, श्री. दगडू भिमाजी बालोडे
श्री. नारायण काशिनाथ गोफणे, सौ. ताराबाई नामदेव घुले
श्री. शिरिषकुमार मुरलीधर बालोडे
सर्व सभासद व कर्मचारी वृंद, ग्रामस्थ, खांडगाव

सहकार चळवळीतील आधारवड
कै. नबाजी रभाजी गुंजाळ
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
बाळासाहेब थोरात
(माजी महसूलमंत्री महाराष्ट्र राज्य)
डॉ. सुधीर तांबे
(माजी विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य)
आ. डॉ. सत्यजीत तांबे
(विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य)
सौ. दुर्गाताई तांबे
(माजी नगराध्यक्षा, संगमनेर नगरपालिका, संगमनेर)
डॉ. मैथिली तांबे
(नगराध्यक्षा, संगमनेर नगरपालिका, संगमनेर)
डॉ. जयश्रीताई थोरात
( अध्यक्षा, एकविरा फाउंडेशन, संगमनेर)

सहकार चळवळीतील आधारवड
कै. नबाजी रभाजी गुंजाळ
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
अमृतेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय संगमनेर खुर्द
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
चेअरमन व संचालक मंडळ स्थानिक स्कूल कमिटी,
प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर सेवक वृंद
श्री खांडेश्वर भजनी मंडळ, खांडगाव
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
खांडेश्वर तरुण मित्र मंडळ, खांडगाव,
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
खांडेश्वर भाजीपाला उत्पादक गट,
खांडगाव, ता. संगमनेर, जि. अ.नगर

सहकार चळवळीतील आधारवड
कै. नबाजी रभाजी गुंजाळ
यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकूल-
दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता












## अभिनेते व शिवप्रबोधनकार डॉ. सागर फापाळे 'डॉ. सुधीरजी तांबे धन्वंतरी पुरस्कारा'ने सन्मानित



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**

पी.आर.के. प्रतिष्ठान, संगमनेर यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय गुणगौरव सोहळा २०२६ रविवारी (दि. ८ मार्च) के.बी. दादा देशमुख सभागृह, सह्याद्री महाविद्यालय येथे उत्साहात पार पडला. राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिक्षक नेते हिरालालजी पगडाल होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव संदीप घोरपडे, अभिनेते व शिव व्याख्याते डॉ. सागर फापाळे, ह.भ.प. विजय महाराज भोईरकर, काँग्रेस तालुका अध्यक्ष अजय फटांगरे, जयराम ढेरंगे, चंद्रकांत घुले, आदिवासी नेते सखाराम गांगड, ह.भ.प. सुधाकर महाराज पाटील, ॲड. किरण रोहम आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संगमनेर येथील अभिनेते व शिवप्रबोधनकार डॉ. सागर फापाळे यांना त्यांच्या वैद्यकीय सेवा व शिवप्रबोधन कार्याची दखल घेत डॉ. सुधीरजी तांबे धन्वंतरी पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. तसेच संदीप घोरपडे यांना मा.ना. बाळासाहेब थोरात आदर्श लोकनेता पुरस्कार, ह.भ.प. सुधाकर महाराज पाटील यांना वारकरी रत्न, तर विजय महाराज भोईरकर यांना वारकरी भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. सागर फापाळे हे वैद्यकीय सेवेबरोबरच छत्रपती शिवरायांच्या भूमिकेद्वारे आणि विविध व्याख्यानांमधून महाराष्ट्रभर शिवप्रबोधनाचे कार्य करत आहेत. रायबा हेच का आपले स्वराज्य या नाटकासह शिवपुत्र संभाजी महानाट्यातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील अभियेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संदीप काकड, गिरीश काकड व अंतोन मिसाळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सहकार आणि समाजकार्यातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व – कै. नबाजी रभाजी गुंजाळ



संगमनेर तालुक्यातील खांडगाव परिसरातील सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातील एक दीपस्तंभ नुकताच मावळला. शेती, सहकार आणि धार्मिक कार्यासाठी आयुष्य अर्पण करणारे ज्येष्ठ समाजसेवक कै. नबाजी रभाजी गुंजाळ यांचे ४ मार्च २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या जाण्याने परिसराने प्रामाणिक, ध्येयवादी आणि समाजाशी घट्ट नाळ जुळलेले नेतृत्व गमावले. २१ ऑगस्ट १९३९ रोजी एका साध्या शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकपणा हे संस्कार त्यांच्या आयुष्याचा पाया ठरले. १९६३ साली वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. मात्र, त्या कठीण काळातही त्यांनी धैर्याने कुटुंब उभे केले.

मे १९६३ मध्ये आंबड येथील सखाराम पाटील भोर यांची कन्या राधाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. राधाबाई यांनीही संसार आणि समाजकार्यात त्यांना खंबीर साथ दिली. १९९९ ते २०१० या काळात त्या सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या संचालक म्हणून कार्यरत होत्या. त्यांचा सौम्य स्वभाव, सहानुभूतीशील वृत्ती आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यामुळे त्या सर्वांच्या आपुलकीच्या बनल्या.

नबाजी पाटील हे प्रगतिशील शेतकरी म्हणूनही ओळखले जात. १९७२ मध्ये त्यांनी ट्रॅक्टर खरेदी करून शेतीत आधुनिकतेचा पाया घातला. १९७४ मध्ये धांदरफळ परिसरातील माळरान जमीन अथक परिश्रमाने सुपीक बनवली. प्रवरा नदीवरून पाईपलाईन टाकून कोरडवाहू जमीन बागायतीत रूपांतरित करण्याचा त्यांनी आदर्श निर्माण केला. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन २०१६ मध्ये जिल्हा परिषदेच्या वतीने त्यांना प्रगतिशील शेतकरी पुरस्काराने गौरविण्यात आले. गावाच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. १९७८ मध्ये खांडगाव दूध संस्थेचे संस्थापक चेअरमन म्हणून त्यांनी कार्य केले आणि तब्बल १५ वर्षे नेतृत्व करत गावाच्या अर्थव्यवस्थेला बळ दिले. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, तंटामुक्ती समितीचे सदस्य, विशेष कार्यकारी दंडाधिकारी तसेच अमृतेश्वर विद्यालयाचे संस्थापक संचालक अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडल्या.

नबाजी पाटील हे वारकरी संप्रदायाचे निष्ठावंत पाईक होते. खांडेश्वर महादेव मंदिर ट्रस्टच्या स्थापनेत आणि विकासात त्यांचा मोठा वाटा होता. लोकसहभागातून मंदिराचा विकास करून भाविकांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ते सदैव प्रयत्नशील राहिले. मंदिर परिसरात विठ्ठल-रुक्मिणी मंदिर उभे राहावे, ही त्यांची शेवटची इच्छा होती. त्यांनी आपल्या सहाही अपत्यांवर उत्तम संस्कार केले. मोठे सुपुत्र सोमनाथ गुंजाळ हे सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असून खांडगावचे माजी सरपंच आणि विद्यमान सदस्य म्हणून कार्यरत आहेत. धाकटे सुपुत्र नानासाहेब शेती व दुग्ध व्यवसाय सांभाळत आहेत. चारही मुली आणि जावईही आपापल्या क्षेत्रात प्रतिष्ठित असून संपूर्ण गुंजाळ परिवार आजही एकोप्याची परंपरा जपत आहे. रोखठोक, स्पष्टवक्ते आणि अन्यायाविरुद्ध निर्भयपणे आवाज उठवणारे नबाजी पाटील हे समाजातील अनेकांसाठी प्रेरणास्थान होते. त्यांचे आयुष्य म्हणजे कष्ट, प्रामाणिकपणा आणि निस्वार्थी समाजसेवेचा आदर्श होता. अशा या कर्मयोग्यास भावपूर्ण श्रद्धांजली.

**– मा. श्री. नामदेव गुंजाळ,**
विश्वस्त, खांडेश्वर महादेव मंदिर, खांडगाव.

## नित्यसेवा क्लिनिकमध्ये महिलांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिलांच्या मौखिक आरोग्याबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने संगमनेर येथील नित्यसेवा क्लिनिकमध्ये ६ ते ९ मार्च दरम्यान मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला शहर व परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या चार दिवसांच्या शिबिरात अनेक महिलांनी दातांची तपासणी करून घेतली. दैनंदिन धावपळीत अनेकदा महिलांकडून स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. विशेषतः दात व हिरड्यांच्या समस्यांकडे वेळेअभावी दुर्लक्ष केले जाते. याच पार्श्वभूमीवर महिलांना मौखिक आरोग्याबाबत जागरूक करण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी दंततज्ज्ञ डॉ. कुमोदिनी घुले यांनी महिलांना दात व हिरड्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. दर सहा महिन्यांनी दंत तपासणी केल्यास दातांमधील कीड सुरुवातीच्या अवस्थेतच ओळखता येते व साध्या उपचारांनी दात सुरक्षित ठेवता येतात, असे त्यांनी सांगितले. मात्र दुर्लक्ष केल्यास पुढे रूट कॅनल किंवा दात काढण्याची वेळ येऊ शकते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

आजच्या आधुनिक दंतचिकित्सेमध्ये रूट कॅनल, दंत प्रत्यारोपण (डेंटल इम्प्लांट), लेझर उपचार, स्केलिंग यांसारखे सुरक्षित व प्रभावी उपचार उपलब्ध असल्याची माहितीही त्यांनी दिली. तसेच दिवसातून किमान दोन वेळा दात स्वच्छ करणे, योग्य पद्धतीने ब्रश करणे, गोड पदार्थांचे प्रमाण कमी ठेवणे आणि वेळोवेळी दंत तपासणी करून घेणे या सवयी अंगीकारण्याचे आवाहनही त्यांनी केले.

महिला दिनानिमित्त आयोजित या शिबिरामुळे महिलांमध्ये मौखिक आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास निश्चितच मदत झाली, अशी भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली. भविष्यातही अशा प्रकारचे आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात यावेत, अशी अपेक्षाही अनेकांनी व्यक्त केली.

# अग्निहोत्र - सुख, शांती, समृद्धीचा राजमार्ग

जीवन संघर्षामुळे सर्वांचेच जीवन आज व्यस्त व गतिमान झाले आहे. या संघर्षामागील वास्तविक उद्देश सुखी होणे हाच असतो. तरीही सुख-शाश्वत सुख म्हणजे नेमके काय व ते मिळविण्याचा उपाय माहीत नसल्याने सर्व अथक प्रयत्न विफल होतांना दिसतात. मग अधिकाधिक सुविधा-साधने जमवत रहाणे, त्याच चाकोरीत फिरत रहाणे यातच सुख-समाधान मानले जाते. काय हे व एवढेच मानवी जीवनाचे उद्दिष्ट आहे? कदापि नाही.

सभोवताली पाहिल्यास हवा-पाण्यापासून ते विचारांपर्यंत प्रदूषण विकोपाला गेले आहे. त्यामुळे ढळणारे निसर्गाचे संतुलन, वेगाने बदलणारे हवामान, नवनवीन व्याधी व साथी, वाढते तणाव-अशांती सर्व काही भयसूचक स्थितीला पोचले आहे. सर्वत्र दिशाहीन मरगळ, औदासिन्य, नैराश्य, अगतिकता पसरल्याचे आढळते. आजच्या परस्परविरोधी अशा सांप्रदायिक रूढी तसेच प्रगत तंत्र व विज्ञान यांच्याकडे यावर ठोस असा उपाय नाही. म्हणून आता 'निसर्गाशी सुसंगत अशी जीवनपद्धती' स्वीकारण्याचा आग्रह विचारवंत-वैज्ञानिक धरत आहेत, जी आजच्या काळाची निकडीची गरज आहे.

अमूल्य असे ते शाश्वत सुख मग आहे तरी काय व ते मिळवावे कसे-कोठे? वास्तविक सुख ही कोणतीही वस्तू नाही. सुख ही अवस्था आहे. ती चिरंतन टिकणाऱ्या आनंदाची आंतरिक अनुभूती असते. ती अवस्था व अनुभूती मिळविण्याचा अधिकार प्राचीनतम अशा वेदांनी विश्वातील प्रत्येक व्यक्तीला दिला आहे. त्यासाठी सुनिश्चित व आदर्श अशा पाच नियमांनी युक्त अशी जीवनपद्धती दिली आहे. वायुमंडलशुद्धीसाठी यज्ञ करणे, म्हणजे नित्याचा यज्ञ असलेले अग्निहोत्र आचरण करणे, निर्ममत्त्व रुजविण्यासाठी सत्पात्रांस दान देणे, संकल्प सिद्धीचे बळ मिळविण्यासाठी नियमितपणे तपाचरण करणे, आत्मशुद्धीसाठी सत्य-अहिंसादि सत्कर्मांचे पालन करणे आणि स्वाध्याय-चिंतनाने मुक्तीच्या परिपूर्णतेकडे वाटचाल करणे, असे हे जीवनमार्गाचे नियम सांगितले आहेत.

हा वेदोक्त राजमार्ग, अर्थात प्राचीनतम क्रियायोग, मानवमात्रांच्या सर्वांगिण कल्याणासाठी दिला गेला. भूतलावरील आजवरची सर्व मते, पंथ व संप्रदायांचा हाच मूळ पाया आहे. शिवपुरी-अक्कलकोटवासी सत्यधर्मप्रणेता परमसद्गुरू श्री गजानन महाराजश्री यांनी एकत्त्वाचा संदेश देत हा प्राचीनतम साधनामार्ग विश्वमानवांच्या कल्याणासाठी पुनः प्रस्थापित केला. वेदांचा भर अग्नि उपासनेवर असल्याने प्राचीन काळाप्रमाणे घराघरातून अग्निहोत्र संपन्न होणे हा आजच्या युगाचा संदेश आहे.

**।। सर्वदाता अग्निहोत्र ।।**

सृष्टी-निर्मितीच्या वेळीच विश्वमानवाच्या सर्वांगिण कल्याणासाठी परमप्रमाण अशी वेदसंपदा दिली गेली. सृष्टीचक्र व्यवस्थितपणे कार्यरत रहाण्यासाठी तसेच विश्वमानवाच्या सुखी व स्वस्थ जीवनासाठी वेदांनी नित्य यज्ञ अग्निहोत्राचे आचरण अत्यावश्यक कर्म म्हणून कथन केले आहे. म्हणून अग्निहोत्र आचरण कृताकृत नव्हे, उलट ते न करणे दोषार्ह मानले जाते.




अग्निहोत्र विधीने वातावरण शुद्ध होऊन परिसरातील पर्यावरण पुष्टी व तुष्टीदायक तत्त्वांनी भारले जाते. त्यामुळे मानवी मन-शरीर, प्राणी व वनस्पतीजीवनाच्या संतुलित विकासासाठी पोषक वातावरण निर्माण होते. निसर्गातील उर्जाचक्रे गतिमान होतात. अग्निहोत्र विधी आचरण करण्यास सोपा, साधा व अत्यंत अल्प खर्च लागणारा आहे. सूर्योदय व सूर्यास्ताच्या स्थानिक वेळांचे अचूक पालन करणे, दशांगुली मापाचे पिरॅमिडसदृश तांबे वा मातीचे यज्ञपात्र वापरणे, त्या पात्रात गोवंशाच्या वाळलेल्या शेण्यांपासून तयार केलेला अग्नि प्रज्वलित करणे, गाईच्या तुपाने माखलेल्या अखंड तांदुळाच्या दोन आहुती देणे आणि आहुती देताना संस्कृत वेदमंत्रांचा उच्चार करणे, या प्रमुख तत्त्वांवर हा विधी आधारित आहे.

अग्निहोत्र करण्यापूर्वी स्थान स्वच्छ असावे. आहुती देणाऱ्याने स्नान किंवा हात-पाय व तोंड धुवून बसावे. उपस्थितांनी हात-पाय धुवून यज्ञपात्राभोवती बसून मंत्र म्हणत मनाने सहभागी व्हावे. अग्नि प्रज्वलित करताना धूप, गुगूळ, गाईच्या तुपातील फुलवात किंवा शेणीच्या तुकड्यास थोडे गाईचे तूप लावून घ्यावे. आहुती देतेवेळी अग्नि प्रज्वलित व निर्धूम असावा. आहुतीचे दोन चिमूट अखंड तांदूळ ताटलीत किंवा डाव्या तळहातात घेऊन त्यावर दोन-तीन थेंब गाईचे तूप टाकावे. वेळ अचूक राहावी म्हणून घड्याळ किंवा रेडिओ समाचारावरून वेळ निश्चित करावी.

**मंत्र –**

सूर्योदयाच्या वेळी सूर्याय स्वाहा, सूर्याय इदं न मम। प्रजापतये स्वाहा, प्रजापतये इदं न मम।। हा मंत्र उच्चारून आहुती अर्पण करावी. सूर्यास्ताच्या वेळी अग्नये स्वाहा, अग्नये इदं न मम। ही पहिली आहुती आणि प्रजापतये स्वाहा, प्रजापतये इदं न मम।। ही दुसरी आहुती अर्पण करावी. आहुती जळून जाईपर्यंत अग्निज्वाळेकडे शांतपणे पाहत बसावे.


अग्निहोत्रामुळे आलेले अनुभव -

अग्निहोत्र आचरण हा सृष्टीनिर्माणकर्ता परमपिता परमात्म्याचा मनुष्यमात्रांसाठी आदेश आहे आणि ते प्रत्येकाचे आद्य कर्तव्य मानले जाते. व्यक्तिशः अग्निहोत्र करणे शक्य नसल्यास सामूहिक पद्धतीनेही ते केले जाऊ शकते. अग्निहोत्र आचरण करणाऱ्या असंख्य लोकांच्या अनुभवांनुसार नित्य अग्निहोत्रामुळे घरातील वातावरण शुद्ध, पवित्र व निर्जंतूक बनते. त्यातून प्राणशुद्धी व मनःशुद्धी लाभते आणि मनावरील ताण दूर होऊन प्रसन्नता व समाधान प्राप्त होते.

अग्निहोत्रामुळे शरणागत वृत्ती वाढते, ध्यान व एकाग्रतेसारख्या साधना सुलभ होतात. घराला व जीवनाला शिस्त लागते, कुटुंबात एकोपा व सामंजस्य वाढते आणि घरात कल्याणकारी वातावरण निर्माण होते. व्यसनमुक्ती मिळण्यास मदत होते. मुलांमध्ये सुसंस्कार वाढतात तसेच त्यांची एकाग्रता व ग्रहणशक्तीही वाढते. अग्निहोत्र भस्म कृषी उत्पादनासाठी उपयुक्त ठरते आणि त्याचे परिणाम देश-विदेशात अनुभवले जात आहेत. मनोवैज्ञानिकांनीही अग्निहोत्राचे सकारात्मक परिणाम त्यांच्या रुग्णांवर अनुभवले आहेत.

पिण्याच्या पाण्यात अग्निहोत्र भस्म टाकल्याने ते पाणी आरोग्यदायी बनते, तसेच त्यापासून प्रभावी औषधे तयार करता येतात. अग्निहोत्रामुळे मनुष्य आपल्या मूळ मताचा निष्ठावान अनुयायी बनतो आणि समाजाचा उत्तम घटक म्हणून घडतो. त्यामुळे अग्निहोत्राला कोणताही पर्याय नसून आजच्या काळात हा मूलभूत यज्ञ अत्यंत आवश्यक मानला जातो.

अग्निहोत्र उपासना केंद्रस्थानी धरून वैद्यकशास्त्र, निसर्गशेती, वातावरणशुद्धी, जैवऊर्जाविज्ञान आणि मनोचिकित्सा यांसारख्या क्षेत्रांमध्ये विविध परिणामांचे परीक्षण व अध्ययन सुरू आहे. अग्निहोत्रासाठी स्त्री, पुरुष, जात, मत, पंथ, संप्रदाय, देश-प्रांत किंवा वय यांचे कोणतेही बंधन नाही. म्हणून थोडासा निश्चय करून आजच अग्निहोत्र सुरू करा आणि सुखमय जीवनाची वाटचाल सुरू करा.



**मा. श्री. विजयराव डाके,**
**संगमनेर**
**मो. ९८२२१९३२४५**

# ड्रेस मेकिंग स्पर्धेत श्रीगोंदा आयटीआय राज्यात प्रथम

## हँडक्राफ्ट ज्यूट वर्कच्या ड्रेस चा राज्यभर डंका



**अकोले**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
संभाजीनगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय तंत्र प्रदर्शन स्पर्धेत श्रीगोंदा औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या शिवणकाम विभागाने ड्रेस मेकिंग कलेत राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळवून शिवणकाम कलेची चुनुक दाखवून दिली आहे.

राज्यस्तरीय तंत्र प्रदर्शन स्पर्धा डिपेक्स संभाजीनगर येथे ५ मार्च ते ८ मार्च या कालावधीमध्ये डिप्लोमा, डिग्री व आयटीआय कॉलेज यांच्यामध्ये पार पडली. आयटीआयमध्ये नॉन इंजिनिअरिंग व्यवसायामध्ये नाशिक विभागातील श्रीगोंदा आयटीआयने ड्रेस मेकिंगमध्ये प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले.

प्रदर्शनामध्ये आयएएस अधिकारी, कौशल्य विकास व नाविन्यता विभागाच्या सचिव मनीषा वर्मा यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थ्यांचे कौतुक केले. इंटरनॅशनल फॅशन शो कॉम्पिटिशनमध्ये सहभागी होण्यास प्रशिक्षणार्थ्यांना सूचित केले. सदर प्रदर्शनात हँडक्राफ्ट जूट वर्क या प्रोजेक्टवर काम करत डिझायनर ड्रेस, सोलर सॅग व सोलर जॅकेट बनवून नाविन्यतेकडे लक्ष वेधले. सदर प्रोजेक्ट ड्रेस मेकिंग ट्रेडमधील सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी केला.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांनी १२५ प्रत्येकी बॅग व शबनम तयार करण्याची ऑर्डर प्रशिक्षणार्थ्यांना दिली. हँडक्राफ्टमधील अनेक वस्तूंद्वारे हस्तकला दाखवून आपल्या तांत्रिक ज्ञानाची चुणूक दाखविली आहे.

शिवणकाम शिल्पनिदेशिका दमयंती विजय भोर यांच्या मार्गदर्शनातून हा अभिनव प्रकल्प साकारला आहे. प्राचार्य एस. व्ही. जाधव, गटनिदेशक आर. आर. जंगम यांच्या प्रेरणेतून शिल्पनिदेशक आर. वाय. पवार, एम. एस. गलांडे यांनी टीम लीडर म्हणून काम पाहिले.

प्रशिक्षणार्थ्यांनी उद्योजक बनण्याचे स्वप्न पाहिले असून, प्रत्यक्षात उतरवण्यासाठी शिल्पनिर्देशक दमयंती भोर यांना या कौतुकास्पद कामातून अधिक प्रेरणा मिळेल, अशी आशा वर्मा यांनी व्यक्त केली. श्रीगोंदा आयटीआय नव्हे, तर नाशिक विभागाचा झेंडा राज्यात फडकविण्याचे काम विद्यार्थीनींनी केल्याचे प्राचार्य जाधव म्हणाले.

# अफवांना बळी न पडता मुलींनी लस घेणे आवश्यक- सौ. खताळ

## तळेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात एच पी व्ही लसीकरणाचा शुभारंभ

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**
पोलिओपासून ते विविध आजारांवर मात करण्यासाठी लसीकरण अत्यंत आवश्यक आहे. एचपीव्ही ही लस यापूर्वी खाजगी स्तरावर उपलब्ध होती; मात्र महायुती सरकारने आता ही लस मुलींसाठी मोफत उपलब्ध करून दिली आहे. कुठल्याही अफवांना बळी न पडता मुलींनी एचपीव्हीचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी केले.



संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये राज्यशासनाच्या वतीने सुरू केलेल्या मुलींसाठीच्या मोफत एच. पी. व्ही. लसीकरणाचा शुभारंभ सौ. नीलम खताळ यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्या आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. या कार्यक्रमास प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निलेश माने, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, उपसरपंच मयूर दिघे, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब दिघे, शिवाजी आहेर, नंदकुमार देशपांडे, राजेंद्र आहेर, उत्तम दिघे, अमोल दिघे, नवनाथ राऊत, कचरू वारूंक्षे, रवींद्र दिघे, सुवर्णा दिघे, निखिल सानप आदींसह आरोग्य सेविका आणि आशा सेविका उपस्थित होत्या.

सौ. खताळ म्हणाल्या की, आजच्या मुलीच उद्याचे भविष्य आहेत. मुली व महिलांमध्ये कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्याने त्यापासून संरक्षण मिळावे यासाठी एचपीव्ही लस महत्त्वाची आहे. काहीजण अफवा पसरवून सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्या अफवांना बळी न पडता मुलींनी ही लस घेणे आवश्यक आहे. एचपीव्ही लसीसह इतरही लसीबाबत आशा सेविका व आरोग्य सेविकांनी प्रत्येक घराघरात जाऊन लसीकरणाचे महत्त्व महिलांना पटवून द्यावे. मुलींसाठीच नव्हे, तर मुलांसाठीही विविध आजारांपासून संरक्षण देणाऱ्या लसी उपलब्ध आहेत, आणि त्या लसीकरणाचा लाभ प्रत्येकाने घ्यावा. आशा सेविकांच्या काही अडचणी असल्यास त्यापण मला सांगाव्यात. आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून त्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले.

**वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित; बदली मागणी....**

तळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ हा शासकीय कार्यक्रम असताना सुद्धा तळेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. डामसे अनुपस्थित होते. उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यांच्या विषयी सौ. नीलम खताळ यांच्या समोर तक्रारी केल्या. डॉ. डामसे हे कधीच प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची तपासणी करण्यासाठी थांबत नाहीत. त्यामुळे त्यांची बदली करून या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी दुसरे वैद्यकीय अधिकारी द्यावे आणि त्यांच्या बदलीचा प्रस्ताव गटविकास अधिकाऱ्यांकडे पाठवावा, अशी सूचना त्यांनी प्रभारी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना केली.

राज्य शासनाच्या वतीने मुलींसाठी मोफत एचपी. व्ही. लस देत आहे. या लसीबाबत काही अफवा पसरवल्या जात आहेत. मुलींच्या आई-वडिलांनी या कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवता सर्व मुलींनी लसीकरण करून घ्यावे.
डॉ. निलेश माने,
प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी.

# खांडगाव जि.प. शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात



**खांडगाव**
**(युवावार्ता प्रतिनिधी)–**
विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकण्यासाठी आणि ऐतिहासिक वारशाची ओळख करून देण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खांडगाव यांची वार्षिक शैक्षणिक सहल नुकतीच अत्यंत उत्साहात आणि आनंदात पार पडली. दिनांक ९ मार्च २०२६, सोमवार रोजी सकाळी ४.३० वाजता शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रायभान गुंजाळ, माजी अध्यक्ष आदिक गुंजाळ यांच्या हस्ते लाल परीचे पूजन करून सहलीस सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी नेवासा ते औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) या मार्गावरील महत्त्वाच्या ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेटी दिल्या.

सहलीची सुरुवात पैस खांब (नेवासा) येथे झाली, जिथे ज्ञानेश्वरी लिहिली गेली. त्यानंतर भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या देवगड येथील दत्त मंदिराला भेट देऊन विद्यार्थ्यांनी दर्शन घेतले. इतिहासाची साक्ष देणारा अभेद्य दौलताबाद किल्ला चढताना विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. किल्ल्याची रचना आणि त्या काळातील संरक्षण व्यवस्था पाहून विद्यार्थी थक्क झाले.

जागतिक वारसा असलेल्या वेरूळ लेणी येथील दगडात कोरलेले शिल्पकाम पाहून विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीच्या समृद्धतेचा अनुभव घेतला. त्यानंतर घृणेश्वर मंदिर (बारावे ज्योतिर्लिंग) आणि निद्रिस्त अवस्थेतील भद्रा मारुतीचे दर्शन घेऊन अध्यात्मिक ऊर्जा मिळवली. सहलीच्या शेवटच्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी औरंगाबाद येथील सिद्धार्थ गार्डनमध्ये विविध प्राणी आणि निसर्गाचा आनंद लुटला. तसेच 'दख्खनचा ताज' समजल्या जाणाऱ्या बीबी का मकबरा या वास्तूची माहिती घेतली.

केवळ पुस्तकी ज्ञान न देता, प्रत्यक्ष ठिकाणांना भेटी दिल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि इतिहास अधिक चांगल्या प्रकारे समजतो. सहल यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दादाभाऊ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकवृंदानी प्रयत्न केले. शाळा व्यवस्थापन समिती, तसेच विविध शालेय समित्या यांचे पदाधिकारी आणि पालकांचे मोलाचे सहकार्य सहलीसाठी लाभले. शिस्तबद्ध नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ही सहल अविस्मरणीय ठरली.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी मंगला कलगुंडे व केंद्रप्रमुख रवींद्र अनाप यांनी अभिनंदन केले.

# रोटरीच्या 'हॅपी स्कूल' प्रोजेक्टमुळे कातळापूरच्या आदिवासी शाळेचा कायापालट

राजूर (प्रतिनिधी) -
रोटरीच्या हॅपी स्कूल प्रोजेक्टमुळे कातळापूर या आदिवासी खेड्यातील शाळेचा मोठा कायापालट झाला असून, ही शाळा खऱ्या अर्थाने हॅपी स्कूल बनली आहे. सत्यनिकेतन संस्थेचे दिवंगत सचिव रा. वी. पाटणकर यांच्या प्रेरणेने १९८७ साली आदिवासी भागातील कातळापूर येथे सर्वोदय विद्या मंदिर हे माध्यमिक विद्यालय सुरू करण्यात आले. सुरुवातीला दूध डेअरीच्या इमारतीत सुरू झालेल्या या विद्यालयात इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे तीन वर्ग आहेत. सत्यनिकेतन संस्थेचे विद्यमान अध्यक्ष एम. एन. देशमुख यांच्या आर्थिक मदतीमुळे शाळेची स्वतंत्र इमारत उभी राहिली. त्यामुळे आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची मोठी सोय झाली. मात्र, शाळेत आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. इमारत जुनी झालेली, स्वच्छतागृहांची कमतरता, स्वतंत्र प्रयोगशाळा नसणे तसेच संगणक सुविधेचा अभाव, अशा अनेक अडचणी विद्यार्थ्यांना भेडसावत होत्या.



दरम्यान, रोटरी क्लब ऑफ पुणे यांच्या सहकार्याने या शाळेचे रूप पालटले. रोटरीच्या हॅपी स्कूल प्रोजेक्ट अंतर्गत पुणे येथील रोटरी क्लबच्या भरीव निधीतून न. वि. देशमुख सर्वोदय विद्या मंदिरात विविध सुविधा उभारण्यात आल्या. यामध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, मुलांच्या स्वच्छतागृहांचे नूतनीकरण, विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची जलकुंभ व्यवस्था, दोन स्मार्ट डिजिटल क्लासरूम, वर्गखोल्यांचे नूतनीकरण, १०० बेंचेस, अद्ययावत संगणक कक्ष, सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा, मुख्याध्यापक कार्यालय व स्टाफरूमचे नूतनीकरण, तसेच सुमारे ३०० पुस्तकांचे वाचनालय सुरू करण्यात आले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, यासाठी विविध प्रकारचे क्रीडा साहित्य देण्यात आले असून, संपूर्ण शाळेला आकर्षक रंग देत तिचा नवा लूक तयार करण्यात आला आहे.

रोटरी क्लबच्या वतीने या हॅपी रोटरी स्कूलचे उद्घाटन रोटेरियन हसमुखभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी रोटेरियन झरीर दादाचानजी, संजय खेर, मैथिली मनकावड, केपीजे जयपालन, सरफराज शॉ, मनोहर जगदाळे, चंद्रशेखर मनकावड, पुष्पा जयपालन, दिलशाद दादाचानजी, शर्मिन शॉ, माधुरी जगदाळे तसेच संस्थेचे सचिव एम. एल. मुठे, कोषाध्यक्ष विवेक मदन, जेष्ठ संचालक प्राचार्य टी. एन. कानवडे, अशोक मिस्त्री, प्रकाश टाकळकर, एस. टी. एलमामे, सरपंच बाळासाहेब ढगे, विजय पवार, राम पन्हाळे, रामजी काठे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत धुमाळ व जेष्ठ शिक्षक संजय व्यवहारे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे आभार अनिल पवार यांनी मानले.

# संगमनेरमध्ये शेअर मार्केट...

पान नं. १ वरुन

यांच्या एचडीएफसी बँक खात्यावर पैसे ट्रान्सफर करण्यात आले. त्यानंतर १८ डिसेंबर २०२४ रोजी पुन्हा 'प्रथमेश वेल्थ मॅनेजमेंट'च्या नावाने रक्कम वर्ग करण्यात आली. यानंतर वेळोवेळी आरोपींना पैसे देण्यात आले. नोटरी करार आणि चेकही दिले. गुंतवणूक केल्यानंतर संगमनेर न्यायालय परिसरातील जिजामाता प्राईड इमारतीत साक्षीदारांसमोर अधिकृत नोटरी करार करण्यात आला. तसेच परताव्याच्या खात्रीसाठी काही चेकही देण्यात आले. दर महिन्याच्या ५ किंवा ६ तारखेला परतावा दिला जाईल, असे सांगण्यात आले होते. सुरुवातीच्या दोन महिन्यांत ११ टक्के दराने काही रक्कमही देण्यात आली, मात्र त्यानंतर पैसे देण्यास टाळाटाळ सुरू झाली.

# मालपाणी विद्यालयातील विद्यार्थ्यांना मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदके



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–**
संगमनेर येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालय, संगमनेर येथील विद्यार्थ्यांनी इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी विद्यालयातील ४० विद्यार्थी बसले होते. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात विद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदके (गोल्ड मेडल ऑफ एक्सलन्स) मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये श्लेषा रवींद्र गवळी, अमन सलीम शेख, अमीरा सलीम शेख, शरयू प्रमोद सागर, अथर्व गणेश डोंगरे, मनस्वी संतोष दिवे, वेदांती राजाराम शिंदे, क्षितिज कपिल गऊल, रुचिका रवींद्र गवळी, जान्हवी कैलास पावबाके, वेदा भगवत पोखरकर आणि अथर्व प्रविण जगताप यांचा समावेश आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयातील गणित शिक्षिका मानसी मुळे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी अभिनंदन करून त्यांच्या यशाचे कौतुक केले.

# इंदिरानगरच्या समाजजीवनातील आधारवड : शीलाताई करंजेकर

८ मार्च हा दिवस जगभर जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. भारतातही या निमित्ताने विविध ठिकाणी कर्तृत्ववान महिलांचा सन्मान केला जातो, त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. महिलांना प्रोत्साहन मिळावे, त्यांनी समाजात अजून चांगले काम करावे यासाठी सोशल मीडियातून, वर्तमानपत्रांतून लेखन करून त्यांना प्रेरणा दिली जाते. ही निश्चितच आनंदाची बाब आहे. आज सकाळी महिला दिनानिमित्त आमच्या परिसरातील एक सामाजिक महिला कार्यकर्त्या यांच्याविषयी दोन शब्द लिहावेत, असे मनात आले. त्यांना फोन करण्याचा प्रयत्न केला; मात्र संपर्क होऊ शकला नाही आणि त्यांचा फोटोही मिळू शकला नाही. तरीही त्यांच्या कार्याची आठवण मनात जागी झाली आणि काही शब्द लिहावेसे वाटले.



साधारणपणे १९८५-९० च्या सुमारास मी इंदिरानगर परिसरात राहायला आलो होतो. त्या काळात जॉर्वे येथील सौ. शीलाताई तानाजी करंजेकर आमच्या गल्लीमध्ये राहत होत्या. त्या उच्चशिक्षित असूनही साध्या पत्र्याच्या घरात वास्तव्यास होत्या. त्यांच्या पती देशसेवेसाठी सीमेवर कार्यरत होते. मुलं लहान असतानाही त्यांनी सामाजिक कार्याचा ध्यास सोडला नाही. त्या आमच्या परिसरातील प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होत. परिसरात महिलांचा किंवा कुटुंबातील काही प्रश्न निर्माण झाला, एखादी गडबड झाली, तर सर्वांचे पहिले पाऊल त्यांच्या घरीच वळायचे. त्या शांतपणे दोन्ही बाजू ऐकून समजूत घालत आणि अनेक समस्या मार्गी लावत. त्यांची कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती; मात्र अनेक राजकीय नेत्यांशी त्यांचा परिचय होता. तरीही त्यांनी कधीही त्याचा वैयक्तिक फायदा घेतल्याचे मला आठवत नाही. एकदा मी त्यांना नगरपालिकेची निवडणूक लढविण्याचा आग्रह केला होता; पण त्या त्यासाठी तयार झाल्या नाहीत. त्यांना पदापेक्षा समाजकार्यातच अधिक समाधान मिळत असे.

त्यांच्या बोलण्यात प्रामाणिकपणा आणि ठामपणा होता. खोटेपणा किंवा दिखावा त्यांना मुळीच आवडत नसे. त्यामुळे परिसरात त्या इतक्या लोकप्रिय झाल्या की महिला-पुरुष सर्वजण त्यांना वारंवार भेटत आणि त्यांचे मार्गदर्शन घेत. त्यांच्याविषयी सर्वांच्या मनात आदर होता. मी स्वतःही त्यांना खूप मान देत असे. इतके की कधी कधी त्या समोर दिसल्या, तर आपण काही चूक केली नाही ना, असा विचार मनात यायचा. त्यांचा एक छोटासा ब्युटी पार्लर होता. त्या माध्यमातून त्यांनी अनेक महिलांना स्वावलंबी होण्यासाठी प्रशिक्षण दिले. क्लासेस चालविताना त्या महिलांना संसार, मुलांचे संगोपन आणि जीवनमूल्यांविषयी मार्गदर्शन करत. महिलांच्या अडचणी सोडवण्यासाठी त्या मनापासून प्रयत्न करीत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी कधीही आपल्या कार्याचा गाजावाजा केला नाही. प्रसिद्धीपासून त्या नेहमी दूर राहिल्या. आज त्या आमच्या परिसरात राहत नसल्या, तरी इंदिरानगरमध्ये कोणती अडचण किंवा घटना घडली, कोणीतरी संकटात आहे हे कळले, की त्या वेळ काढून तिथे येतात, परिस्थिती समजून घेतात आणि संबंधित व्यक्तीला आधार देतात. त्यांच्या शब्दांत इतकी ताकद आहे, की त्यांनी सांगितलेली गोष्ट सहज पटते.

आध्यात्मिक विषयांवरही त्यांचा सखोल अभ्यास आहे. जीवनाविषयीचे त्यांचे तत्त्वज्ञान लोकांना प्रेरणा देणारे आहे. अलीकडे त्या विविध ठिकाणी व्याख्यानेही देत असल्याचे समजले आणि त्याचा मनापासून आनंद झाला. आजच्या धावपळीच्या युगात अशा व्यक्तिमत्त्वांची समाजाला नितांत गरज आहे. परिसरातील अनेक मुला-मुलींची नावे ठेवण्याचे कामही त्यांनी केले आहे. लहान मुलांमध्ये शिस्त आणि नीटनेटकेपणा रुजविण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. आजही त्या महिलांसाठी आणि समाजासाठी कार्यरत आहेत. ८ मार्च, जागतिक महिला दिनानिमित्त त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी, असे वाटले. त्यांच्या सारख्या कर्तृत्ववान, निस्वार्थी महिलांमुळे समाज अधिक सक्षम होतो. जागतिक महिला दिनानिमित्त सर्व नारीशक्तीला मनःपूर्वक शुभेच्छा.

**– श्री. ज्ञानेश्वर नाईक, संगमनेर**
सामाजिक कार्यकर्ते

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर...................... 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# संगमनेरमध्ये 'मराठी भाषा भवन' उभारावे

## अधिवेशनात आ. खताळ यांची शासनाकडे मागणी




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संगमनेर मतदारसंघाचे आ. अमोल खताळ यांनी संगमनेर शहरात मराठी भाषा भवन स्थापन करण्याची मागणी विधानसभेत केली. मराठी भाषेच्या जतन, संवर्धन आणि प्रसारासाठी संगमनेर येथे स्वतंत्र मराठी भाषा भवन उभारण्यात यावे आणि त्यासाठी राज्य शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून देत सहकार्य करावे, अशी विनंती त्यांनी सभागृहातून केली.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी राज्य शासनाच्या वतीने विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. या संदर्भात शासनाने स्थापन केलेल्या समितीचे अध्यक्ष प्रा. रंगनाथ पठारे हे संगमनेर मतदारसंघातील असल्याचा अभिमान असल्याचेही आमदार खताळ यांनी यावेळी नमूद केले. मराठी भाषा आणि साहित्याच्या समृद्ध परंपरेचा वारसा लाभलेल्या संगमनेर शहरात सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळींना नेहमीच चालना मिळत आली आहे.

संगमनेर हे शहर साहित्य, संस्कृती आणि सामाजिक चळवळींसाठी ओळखले जाते. अनेक साहित्यिक, कवी, लेखक आणि विचारवंतांनी या शहरातून मराठी साहित्यविश्वात मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे या शहरात मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यास, संशोधन, तसेच विविध सांस्कृतिक उपक्रम राबवण्यासाठी मराठी भाषा भवन उभारण्याची गरज असल्याचे आमदार खताळ यांनी अधोरेखित केले. मराठी भाषा भवन उभारल्यास येथे साहित्य संमेलन, व्याख्याने, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच मराठी भाषेच्या अभ्यासासाठी विविध उपक्रम आयोजित करता येतील. तसेच तरुण पिढीमध्ये मराठी भाषेबद्दल अभिमान आणि जाणीव निर्माण होण्यासही मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर संगमनेर शहरात मराठी भाषा भवन उभारण्यासाठी राज्य शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधानसभा सभागृहातून केली. त्यांच्या या मागणीमुळे संगमनेर शहरातील सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळींना नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# लिंगदेवमध्ये सोंगाच्या लिलावातून मिळाले १६ लाख

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - संबळ, डफ, सनई पारंपरिक वाद्यांच्या ठेक्यावर दशावतारातील सोंगाची पावले थिरकतात अन् गुढीपाडव्याला पारंपरिक संगीत आखाडीने (बोहाडा) लिंगेश्वर महादेव यात्रा उत्सव लिंगदेव येथे साजरा होतो. १९ मार्च रोजी पारंपरिक संगीत आखाडी यात्रा उत्सव साजरा होत आहे. यावेळी झालेल्या सोंगाच्या लिलावातून देवस्थानला १६ लाख उत्पन्न मिळाले.

इंद्रजित ९२ हजार, हिरण्यकश्यपू ८० हजार, सूत्रधार ८० हजार, रावण ७६ हजार, एक वार, दोन वार, तीन वार अशा लिलाव बोलीतून गावकरी यात्रेत सोंगे नाचविण्याचा मान मिळवितात. फक्त गावातील लोकच आखाडीत पौराणिक पात्र घेऊन सहभागी होतात. शनिवारी लिलाव बोली झाली. इंद्रजित पात्रासाठी सर्वाधिक ९२ हजार रुपयांची बोली अर्णव अमोल फापाळे यांनी लावली. सूत्रधार ८० हजार (एकनाथ फापाळे), हिरण्यकश्यपू ८० हजार (जीवन होलगीर), रावण ७६ हजार (बन्सी होलगीर), भीम ५४ हजार (भीमा होलगीर), कृष्ण-भीष्म-अर्जुन ६० हजार (बाळासाहेब होलगीर) आणि वाघ्या-मुरळी ५५ हजार (भीमाशंकर हाडवळे) अशा बोली लावून सोंग नाचविण्याचा मान मिळवला.

नंदादीपचा मान प्रमोद पवार यांनी ६६ हजार रुपयांना पटकावला. दत्त मंदिर नंदादीप ३७ हजार (दत्तू कानवडे), भगवान लिंगेश्वर अभिषेक ३७ हजार (सुरेश पवार) आणि महाआरतीचा मान ७२ हजार रुपयांना (ऋषिकेश (नवार) देण्यात आला. यात्रेच्या आखाडीचे उद्घाटन ५२ हजार रुपयांना सदाशिव कानवडे यांनी, तर दीप प्रज्वलनाचा मान ५५ हजार रुपये देऊन अमित घोमल यांनी मिळविला आहे.

# कोयता हल्ला प्रकरणातील फरार आरोपी जेरबंद

## तीन दिवसांची पोलीस कोठडी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील इंदिरानगर परिसरात २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या कोयता हल्ला प्रकरणात फरार असलेल्या दोन आरोपींना अखेर संगमनेर शहर पोलिसांनी सांगली जिल्ह्यातून अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींना संगमनेर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदिरानगर परिसरात प्रांत अधिकाऱ्यांच्या बंगल्या समोरील मैदानात नाईट क्रिकेट स्पर्धा सुरू असताना जुन्या वादातून रोहित वाळके यांच्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे मैदानात एकच गोंधळ उडाला आणि तेथे उपस्थित युवकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या हल्ल्यात रोहित वाळके गंभीर जखमी झाले होते.

या घटनेप्रकरणी रोहित वाळके यांच्या पत्नी ममता वाळके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अथर्व रासने, ओम काथे, साहिल देवरे, सुमित शेवंते आणि शैलेश रोकडे या पाच जणांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेनंतर अवघ्या दोन दिवसांत पोलिसांनी अथर्व रासने व शैलेश रोकडे यांना ताब्यात घेतले होते, तर उर्वरित तीन आरोपी फरार झाले होते. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांच्या नेतृत्वाखालील पथकाने फरार आरोपींचा शोध सुरू ठेवला. तपासादरम्यान आरोपी सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील भिलवडी येथे लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक पोलिसांच्या मदतीने ओम काथे व साहिल देवरे या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

दोन्ही आरोपींना संगमनेर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, आरोपी शैलेश रोकडे याची रवानगी अहिल्यानगर येथे करण्यात आली आहे. तर पुढील तपासात सुमित शेवंते याचा या कटात प्रत्यक्ष सहभाग आढळून न आल्याने त्याच्यावरील कारवाईबाबत निर्णय प्रलंबित असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

# टॉवरच्या कामात साडेतीन लाखांचा अपहार ?

## कौठे कमळेश्वरच्या सरपंच, ग्रामसेवक, ठेकेदारास नोटीस




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यात कौठे कमळेश्वर ग्रामपंचायतीने पंधराव्या वित्त आयोगाअंतर्गत गावात सुरक्षा यंत्रणा टॉवर बसवण्याच्या कामात सरपंच, ग्रामसेवक व ठेकेदारांनी संगनमताने ३ लाख ६० हजार रुपयांचा अपहार केल्याबाबतची कारणे दाखवा नोटीस गटविकास अधिकाऱ्यांनी तत्कालीन सरपंच, ग्रामसेवक व ठेकेदाराला बजावल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

ग्रामपंचायत सदस्य नागेश यादव व लक्ष्मण जोंधळे यांनी या संदर्भात चौकशीची मागणी केली होती. ग्रामपंचायत सदस्य यादव व जोंधळे यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे १३ फेब्रुवारी रोजी लेखी तक्रार केली होती. यात कौठे कमळेश्वर येथील सरपंच, ग्रामसेवक व ठेकेदार यांनी संगनमताने गावात सुरक्षा टॉवर यंत्रणा उभारणे कामात ३ लाख ६० हजार रुपयांचा अपहार केल्याचे निदर्शनास आणून दिले. या कामातील मूळ आराखड्यामध्ये अडीच लाख रुपये तरतूद करण्यात आली आहे. या कामास कोणतीही प्रशासकीय मान्यता नसून तांत्रिक व अंदाज पत्रकीय मान्यताही घेण्यात आलेली नाही. या कामाची निविदा प्रसिद्ध केली नाही. कामाचे रेखांकन केले नाही, सदर काम पूर्ण होण्यापूर्वी रक्कम ठेकेदाराला अदा करण्यात आली आहे. या प्रकारामुळे

गटविकास अधिकाऱ्यांनी तत्कालीन सरपंच वाल्हुबाई विठ्ठल वराडे, ग्रामसेवक व ठेकेदार यांना कारणे दाखवा नोटीस बजविली आहे. नोटीस मिळताच सर्व मुद्यांचा खुलासा, पुरावे, दस्तावेज सादर करावा. याबाबत सीईओंनीही गंभीर दखल घेतली आहे.

INVOFIX
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
तुमच्या सौंदर्याला उठाव देणारी
सेले नव्हे होलसेल सेल
लेडीज वेअर
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25